
# कृषितीर्थ

डिसेंबर २०२३ • वर्ष ५ • अंक १२ • जळगाव • पृष्ठे ५२ • मूल्य १० रू.





कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी
हे आपल्या जीवनाचे तीन प्रमुख आधारस्तंभ असले पाहिजेत– भवरलाल जैन



**भवरलाल जैन**
संस्थापक अध्यक्ष -
जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.

**जन्म :** १२ डिसेंबर १९३७
**निर्वाण :** २५ फेब्रुवारी २०१६

http://www.bhavarlaljain.in/

**कृषितीर्थ**

**संपादक**

डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे;
वर्ष: ५; अंक: १२ (५०) (डिसेंबर २०२३/
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी
संपादक व संचालक सहमत असतीलच
असे नाही.)

**मुद्रक, प्रकाशक**

मनिष अमृतलाल शहा यांनी जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. जळगाव यांच्यावतीने आनंद पब्लिकेशन, १०६/१/ए, एन. एच. क्र.५३, मुसळी फाटा, ता. धरणगाव, जि. जळगाव (महाराष्ट्र) येथून छापून जैन प्लास्टिक पार्क, पोस्ट बॉक्स नं.७२, बांभोरी, जळगाव-४२५००१ येथून अंक प्रकाशित केला आहे.

**पत्ता**

जैन प्लास्टिक पार्क, रा.म.क्र. ५३,
पो.बॉ. ७२, जळगाव-४२५००१ (महा.)
दूरध्वनी: ०२५७-२२५८०११;
ई-मेल: krushitirth@jains.com;
**संकेतस्थळ: www.jains.com**

**वर्गणी**

वार्षिक वर्गणी १०० रूपये. वर्गणीचा धनादेश 'कृषीतीर्थ जैन इरिगेशन' सिस्टीम्स लि, या नावाने काढावा.

आपण वर्गणी आॅनलाईन पद्धतीने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यावर जमा करू शकता.

बँक अकाउंट - ३७६८८८३२७३८

IFSC Code - SBIN०००७५७०

ब्रँच पत्ता - ९३, पोलन पेठ, दाणा बाजार, जळगांव. ४२५००१

# अनुक्रमणिका

**०४** **अध्यक्षीय - अशोक जैन - स्वानुभवातून उधाणलेला भाऊंचा कर्मयोग !**



जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन उर्फ मोठेभाऊ यांची येत्या १२ डिसेंबरला जयंती आहे. त्यानिमित्ताने आयुष्यभर अखंडपणे केलेल्या कर्मपूजेची वैशिष्ट्ये सांगून भविष्याच्या वाटचालीचे व कामकाज पद्धतीचे सुतोवाच करणारे अध्यक्षीय.

**०६** **संपादकीय - डॉ. सुधीर भोंगळे - भाऊंची मातीवरची श्रद्धा**

शेती व शेतकऱ्याच्या जीवनात मातीला अनन्यसाधारण महत्व आहे. ते ओळखून मातीवर प्रचंड श्रद्धा ठेवलेल्या व तिची गुणवत्ता जोपासण्यासाठी अविरत मेहनत केलेल्या भवरलाल भाऊंनी मातीचा पान्हा सकस ठेवण्यासाठी आयुष्यभर जी धडपड केली तिचा आढावा घेऊन माती आणि भाऊ यांच्या आंतरिक नात्याची उकल करणारे हे विशेष संपादकीय भाऊंच्या जयंतीनिमित्त.



**२०** **विशेष मुलाखत - शरद पवार - भवरलाल भाऊ माझे सांगाती**



भारताचे माजी कृषीमंत्री आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा.श्री. शरदराव पवार आणि भवरलाल जैन यांचे अत्यंत घरोब्याचे संबंध होते. जैन आणि पवार कुंटुंबाचा गेल्या ४०-४५ वर्षांपासूनचा स्नेह असून तो दोन्ही घराणी आदराने व बारकाईने जपत आली आहेत. या नात्यातले धागेदोरे मा. शरद पवार यांनी आठवणींच्या रूपाने येथे विणले आहेत.

**३४** **विशेष मुलाखत - नितीन गडकरी - भाऊंची जैनहिल्सची निर्मिती: पाणलोट विकासाचे परिपूर्ण मॉडेल**

जळगावच्या जैन हिल्सला भेट दिल्यावर केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री मा.श्री. नितीन गडकरी हे सौर उर्जा प्रकल्प आणि भाऊंनी शास्त्रशुद्ध पद्धतीने विकसीत केलेला पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम पाहून भारावून गेले होते. त्यातूनच त्यांची भाऊंबद्दलचा आदर व प्रेमाची भावना वृद्धिंगत होत गेली. त्याची त्यांनी स्वतःच सांगितलेली ही कहाणी.



**४०** **विशेष मुलाखत - डॉ. माधवराव चितळे - भाऊंचे मनोरथ हायटेक शेतीचे!**



आंतरराष्ट्रीय किर्तीचे जलतज्ज्ञ आणि भारताचे व महाराष्ट्राचे सेवानिवृत्त पाटबंधारे सचिव डॉ. माधवराव चितळे यांचे भवरलाल भाऊंवर प्रचंड प्रेम होते. दोघांनाही एकमेकांबद्दल अतिव आदर होता. हे प्रेमाचे नाते ज्या दुसऱ्या जल व सिंचन आयोगाच्या कामातून निर्माण झाले त्याची डॉ. चितळे यांनी भाऊंच्या जयंतीनिमित्त सांगितलेली कथा.

**४६** **विशेष मुलाखत - अरूण गुजराथी - भाऊंची नितीमत्ता व मानवता अधिक भावणारी**

महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष व माजी मंत्री मा. अरूणभाई गुजराथी आणि मोठे भाऊ यांचे चांगले प्रेमाचे संबंध. भेटीत अनेक विषयांवर चर्चा व्हायची. त्यातून निदर्शनास आलेल्या भाऊंच्या वैशिष्ट्यांचा आणि दोघांमध्ये झालेल्या संवादाची श्री. अरूणभाईंनी केलेली ही उजळणी.



**ता.क. - शेतीच्या क्षेत्रात शेतकऱ्यांनी कायम राहून त्यांची आर्थिक उन्नती व्हावी व ती शाश्वत राहावी यासाठी ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाचा वापर व प्रसार होत राहणे आवश्यक आहे. हा जैन इरिगेशन कंपनीचे संस्थापक अध्यक्ष असलेल्या भवरलालजी जैन यांचा विचार होता. या विचारांना व ध्येयांना पुढे नेण्याच्या उद्देशाने कंपनी हे मासिक चालवित असून मासिकातील ज्ञान व माहिती सर्व शेतकऱ्यांनी अंगिकारावी व जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत ती पोहचावी हा आमचा हेतू आहे. तथापि ज्यांना या मासिकातील मजकूर पुर्नमुद्रीत करून वापरायचे असल्यास त्यांनी कंपनीची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.**

# स्वानुभवातून उधाणलेला भाऊंचा कर्मयोग

कर्म हेच मोठ्या भाऊंच्या जीवनाचे सूत्र होते. कर्मनिष्ठेतूनच जीवन-विकास होत असतो यावर त्यांची गाढ श्रद्धा असल्यामुळे ते सतत कोणत्या ना कोणत्या कामात गुंतलेले असत. नवनवीन विचार करणं, तो प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यासाठी धडपडणं हा त्यांचा स्वभाव बनलेला होता. काम करण्याची व ते पूर्णत्वाला नेण्याची स्वत:ची अशी पद्धती त्यांनी विकसीत केली होती. काम हे उत्कृष्ट गुणवत्तेचेच झाले पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. कसेही करून कामाचा उरका पाडणे आणि निकृष्ट प्रतीचे कामे करणे त्यांना कधीच मान्य झाले नाही. प्रत्येक काम परिपूर्ण, अचूक, नाविन्यपूर्ण, उपयुक्त आणि समाजाला व राष्ट्राला पुढे नेणारे असले पाहिजे असा त्यांचा सतत आग्रह असल्यामुळे त्यांच्या विचार व कृतीला वैयक्तिक स्वार्थाची व स्वहिताची किनार नव्हती. अशा या दुर्मिळ व अनोख्या कर्मदृष्टींचा उपनिषत्कालापासून सर्व विचारवंतांनी गौरव केला आहे. ईशोपनिषद स्पष्टपणे सांगते की, कर्मे करीतच प्रदीर्घ शंभर वर्षे जगण्याची इच्छा धरावी. योग्य हातवटीने केलेली कर्मे माणसाला बंधनकारक न होता उलट आनंददायीच ठरतात. यांचा अनुभव स्वतः भाऊंनी घेतलेला असल्यामुळे ईशावास्यातील

**कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः ।**
**एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ॥ ईशा. २**

हे सूत्र त्यांच्या जीवनधारणेचा ओजस्वी मंत्र बनला होता. 'जिजीविषेत् शतं समाः, कर्माणि कुर्वन् एवं, इतः अन्यथा न अस्ति' व 'कर्म नरे न लिप्यते' हे शब्द समूह केवळ कर्मयोगाचीच नव्हे, तर जीवनाची चतु:सूत्री आहे. यावर त्यांची गाढ श्रद्धा होती. वैदिक तत्वज्ञान किती जीवनाभिमुख आहे, याचे केवळ या एका श्लोकातूनही सम्यक् दर्शन होऊ शकते यांची प्रचिती मोठ्या भाऊंना आल्यामुळे ते आयुष्यभर कर्मपूजक राहिले. 'जिजीविषेत' या पारदर्शक शब्दातून,



**अशोक जैन**
अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.

## अध्यक्षीय

जीवनाकडे पाहण्याची विधायक दृष्टी प्रतीत होते असे ते मानीत असल्यामुळे उत्साहाने व आनंदाने शंभर वर्षे जगण्याची जिजीविषा असणे ही आपल्या तत्वज्ञानाची जीवनधारा आहे. हा निरामय दृष्टीकोन सा-या विफलतावादाला व पलायनवादाला मुळातच निपटून टाकतो. जीवन ही आपल्याला मिळालेली शिक्षा आहे, असे मानीत त्यातून सुटका करून घेण्याची नेभळट विवंचना करीत न बसता उलट या सुवर्णसंधीचा सदुपयोग करून घेणे हाच पुरुषार्थ आहे, अशी शिकवण भाऊंनी आम्हा सर्व मुलांमध्ये आणि उद्योगातील सहका-यांमध्येही रुजविली, वाढीला लावली. त्यामुळे दीनवाणे न होता (अदीनाः स्याम), लाचारीने दास्य न स्वीकारता (अजिता : स्याम) आनंदाने शंभर वर्षे जगण्याची (मोदाम शरदः शतम्) गुरुकिल्ली म्हणजेच कर्मयोग हे त्यांनी प्रत्येकाच्या मनावर बिंबवले, ठसवले आणि प्रत्यक्षात कृतीत उतरावयासही लावले. त्यामुळे सर्व सहकारीही कर्मपूजक झाले. नवनवीन संशोधनात निर्मितीत त्यांनी रस घेतला.

त्यामुळे अल्पावधीत जैन कंपनी गुणवत्तेच्या कामासाठी नावारूपाला आली.


आपल्याला लाभलेल्या उण्यापु-या ७९ वर्षांच्या आयुष्यात भाऊंनी अनेक दैदीप्यमान, मोठमोठी कामे केली. त्या सर्व कामांचा आढावा घ्यायचे ठरविले तर एक स्वतंत्र ग्रंथ त्यासाठी लिहावा लागेल. किंबहुना सविस्तरपणे लिहिले तर प्रत्येक कामाचा स्वतंत्र ग्रंथ होईल. त्यामुळे फक्त सूत्ररूपाने त्यांच्या विचारांची धावती उकल येथे केली आहे. कर्म आपल्यावर कुणी लादलेले नसून ते आपण स्वेच्छेने व उत्साहाने करणार आहोत अशी भावना मनोमन बनली असेल तरच काम करण्यामध्ये रस आणि आनंद निर्माण होऊन ते कधी एकदा पूर्ण करतो अशी मनाला ओढ लागते. या ओढीतून कामात लक्ष्य, जीव व प्राण ओतला जातो. व्यवस्था आमच्या मातोश्रींना करावी लागत असे. मनापासून काम केले तर कर्म आपल्याला फरफटत नेणार नसून ते आपल्या अनुषंगानेच होणार आहे ही खूणगाठ मनाशी नकी बाळगा ही भाऊंची शिकवण आजही सर्वांना कामात उपयोगी पडते आहे. आपण कर्माचे दास नसून कर्माचे नेते आहोत, ही मूलभूत विचारधारा 'नर' या एकाच शब्दातून मनावर ठसविण्यात आली आहे.

हे आपले नरत्व उमजल्यावर आपल्या पायांत कर्माची बेडी अडकण्याची शक्यताच उरत नाही; उलट कर्माचा लगाम आपल्या हाती येतो. या कर्माच्या घोड्यावर स्वार होऊन आपण जीवनपथ आक्रमावयाचा आहे. मोठ्या भाऊंनी हाच धागा पकडून कर्मयोगाचा पाया उभारला आहे. त्या पायावर जैन इरिगेशन कंपनीची मजबुतीने उभारणी झालेली आहे.


स्वत: जमीन नांगरल्याशिवाय मातीचा पोत आणि भावना कळत नाहीत

त्यामुळे उत्कृष्ट प्रतीचे काम तर होतेच पण आपल्याला प्राप्त होणारा आनंद व समाधान हे स्वर्ग सात बोटे उरतं याचा अनुभव अनेकांनी अनेक वेळेला घेतलेला आहे. या अनुभवाबरोबरच भाऊंच्या शाब्बासकीची थाप आणि पहाटही काही सहकाऱ्यांनी निश्चित अनुभवलेली आहे. 'हाती घेऊ ते तडीस नेवू' या न्यायाने व तत्वाने काम करणारे भाऊ काम मनासारखे पूर्ण होईपर्यंत कामाच्या ठिकाणी बसून राहात. अशा वेळी भूख, तहान याचाही विसर त्यांना अनेकदा पडत असे. त्यामुळे कामाच्याच ठिकाणी डबा पाठविण्याची त्यामुळे कितीही संकटे येवो, समस्या आ वासून उभ्या राहोत, त्यांचा प्रभावीपणे, मोठ्या धैर्याने व संयमाने दमदार पाऊले टाकत सामना करण्याचा प्रयत्न आपण आजपर्यंत करीत आलो आहोत आणि पुढेही करणार आहोत. कर्मफलांच्या अभिभाषेत न गुरफटता जीवन विकासासाठी उत्साहाने कर्म करीत राहण्याची हातवटी साधणे हेच भाऊंना अभिप्रेत होते. असे कर्म करण्यासाठी आपण सारेजण या जयंतीच्या निमित्ताने वचनबद्ध होवूया!

# भाऊंची मातीवरची श्रद्धा



**जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन उर्फ मोठेभाऊ यांची १२ डिसेंबरला जयंती आहे. त्यानिमित्ताने भाऊंचा मातीशी असणारा संबंध आणि मातीशी रोज हसत खेळत केलेले काम याचा आढावा घेणारा हे विशेष संपादकीय**



डॉ. सुधीर भोंगळे
संपादक

# संपादकीय

जळगावच्या जैन हिल्सवर १५ फेब्रुवारी २००५ रोजी जलसंधारणाची राज्यस्तरीय कार्यशाळा झाली. तिचे उद्घाटन जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. भवरलाल जैन उर्फ मोठेभाऊ यांच्या शुभहस्ते झाले. त्यावेळी बोलताना भाऊंनी एक फार महत्वाचे व आजच्या काळाला अचूक लागू होणारे विधान केले. ते म्हणाले "जो देश आपली माती घालवतो, तो देश आपला आत्मा घालवितो." आज आपली संपूर्ण पृथ्वी मातीच्या आधारावर उभी आहे. डोंगर-दऱ्या पर्वत, नदी-नाले, जंगले, वनराई, झाडे-झुडपे, गवत, वनस्पती, घरे, इमारती, उद्योगधंदे, व्यवसाय, कारखाने, शाळा आणि एकंदरीतच जमिनीवरील माती हा विकासाचा व सर्व निर्मितीचा प्रमुख आधारस्तंभ आहे. जगातली बहुतेक सगळी शेती आणि अन्नधान्य उत्पादन हे मातीवरच अवलंबून



आहे. या मातीचे काळजीपूर्वक जतन केले पाहिजे यावर मोठ्या भाऊंचा मोठा कटाक्ष होता. कारण या मातीशिवाय मानवी जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अन्नधान्य, तृणधान्य, तेलबिया, डाळी, फळे, भाजीपाला, भरडधान्य, आयुर्वेदिक व सुगंधी औषधी वनस्पती, फुले यापैकी कशाचेही उत्पादन होऊ शकणार नाही याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे मृदसंधारण आणि पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम त्यांनी मोठ्या जोमाने व आग्रहीपणाने व्यापक संत्रावर राबवून मातीची बारकाईने निगा राखून जपणूक केली. १० ऑगस्ट, २००३ मध्ये करार शेतीसंबंधी (कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग) जैन हिल्सवर झालेल्या चर्चासत्रातही मोठ्या भाऊंनी आवर्जून सांगितले होते, मृदसंधारण म्हणजे जमिनीवरची माती वाचली पाहिजे, जलसंधारण म्हणजे

पाणी वाचले पाहिजे आणि जेथे पाणी पडत आहे, तिथेच ते अडवले पाहिजे" (संदर्भ - मुरलेले लोणचं, १० मार्च २०१३, पान नं. २३-२४)

मोठ्या भाऊंच्या भाषणातील वरील दोन अवतरणे येथे जाणीवपूर्वक उद्‌धृत केली आहेत. ती अशासाठी की, शेती आणि शेतकऱ्यांच्या परिस्थिती संबंधीची व मनाची त्यांनी अचूक निरीक्षणे टिपली आहेत. शेतीसंबंधी शेतक-याच्या मनाच्या कुरुक्षेत्रावर जे द्वंद्व चालू आहे त्याचा मनोमन ठाव घेतला आहे. बऱ्याचदा मनाचा ठाव तर सोडाच; पण मनाचा पृष्ठभागही हाती लागणे अवघड आहे तिथे भाऊंनी शेती व शेतकऱ्यांच्या कल्याणाचा, उन्नतीचा, प्रगतीचा व विकासाचा चांगलाच विचार केला. त्यांचा हा विचार हे सकारात्मकतेचे नामी उदाहरण आहे. सकारात्मक मन म्हणजे कृष्ण, शंकात्मक मन म्हणजे अर्जुन. मनाला अभ्यासू प्रश्न पडले पाहिजेत. प्रश्नांचा गोंधळ नको. कधी कधी प्रश्न विचारणारास आपण काय प्रश्न विचारीत आहोत; हेच कळत नाही. मग तो प्रश्न विचारण्याऐवजी बडबडतो. त्यामुळे कोणत्याही विषयावर बोलण्यापूर्वी त्या विषयांचे आलोकन हवे. आपण काय करीत आहोत याचे भान राखले की, कुरूक्षेत्र कळते. भाऊंचा त्याबाबतीत अगदी हातखंडा होता. अभ्यास, निरीक्षण, अनुभव, संवाद यातून त्यांची मते बनलेली होती. त्यांना परिपक्वता आणि ठामपणाची जरतारी किनार होती. एका भाषणात भाऊ स्पष्टपणाने म्हणाले होते, “जोपर्यंत देशाच्या एकूण जमिनीपैकी ४० टक्के जमीन उपयोगात आणली जात नाही किंवा अनुत्पादित राहते, तोवर नैसर्गिक संपत्तीमध्ये संपन्न असलेला भारत गरीबीतच लोळत राहील. जे जमिनीबद्दल सत्य आहे, तेच पाणी वापराचेही आहे. जोपर्यंत दिल्या जाणाऱ्या पाण्यापैकी केवळ ४० टक्के पाण्याचाच वापर पिकाच्या संवर्धनासाठी होत आहे, तोपर्यंत या परिस्थितीत बदल होणार नाही” एवढंच म्हणून भाऊ थांबले नाहीत. त्यांनी एका भाषणात तर “जो देश आपल्या मातीला (जमिनीला) झिजवतो किंवा तिचा नाश करतो, तो स्वत:चाही नाश करीत आहे, हे लक्षात ठेवावे” असा स्पष्ट इशारा देऊन भविष्याची जाणीव करून दिली होती.

हे सगळे मुद्दाम सविस्तरपणाने सांगण्याचे कारण असे की, भाऊंची नुसती मातीवरच श्रद्धा होती असे नाही. तो त्यांचा महा-अनुभव होता. श्रद्धेची प्रवेशपरीक्षा नसते. श्रद्धेचा



*निसर्ग व मातीशी होणाऱ्या संवादामुळे सतत चालतच रहावे आणि पायवाट संपूच नये असे वाटते*

# पाऊलांना मातीचा आधार

कोणत्या रंगाची, कोणत्या प्रकारची व कोणत्या दर्ज्याची माती काय निर्माण करू शकते यांची अचूक जाणीव भाऊंना असल्यामुळे मातीचा निरनिराळ्या कामांसाठी त्यांनी अचूकपणे वापर केला. त्यासाठी मातीचा अभ्यास करून तिची भक्ती केली. भक्ति शास्त्रातल्या नवविधा भक्ती म्हणजे अभ्यासाच्या नऊ पायऱ्या आहेत. माणूस कोणतीही गोष्ट पायरी-पायरीनेच साधतो. श्रवण म्हणजे एकाग्रता. कीर्तन म्हणजे भावात्मता. स्मरण म्हणजे विवेक. पाद सेवन म्हणजे सेवा. अर्चन म्हणजे नित्यकर्म. वंदन म्हणजे विनम्रता. दास्य म्हणजे समंजसपणा. सख्य म्हणजे जीवाचे मैत्र. आत्मनिवेदन म्हणजे आत्मानुभव. या सा-या गोष्टी समृद्ध व्यक्तित्वास अनुकूल आहेत. याची परिपूर्ण जाणीव असल्यामुळे या सर्व गोष्टींचे दिव्य भान भाऊंनी बारकाईने जपले. इतकेच नव्हे




तर मातीवर अपार व अविचल निष्ठा व श्रद्धा ठेवली. श्रद्धा म्हणजे सत्याची जाणीव. सत्य हे ईश्वराचे स्वरूप आहे. श्रध्देत दृढ विश्वास आहे. श्रध्देतला विवेक अनेक ज्ञानांना जन्म देतो. याचा परिणाम वागण्यातून जाणवतो. वागणे आणि बोलणे सहज होते. सहजता ही अनुभवाची खोली आहे. मानवी जीवनाला सर्वार्थाने सहजता आकार देते. म्हणून आपण सारेजण नेहमी असे ऐकत आलो आहोत की सहज बोलणे आणि सहज लिहिणे फार अवघड आहे. पायांना मातीचा आधार असल्यामुळे भाऊंना हे सहजपण कृपा प्रसादासारखे लाभले होते. त्याचा यथायोग्य उपयोग करून आणखी सहज सुंदर कसे जगता येईल याचा आलेख त्यांनी काढून दिला. पुढच्या पिढ्यांनी तो सहजपणे आपल्या रोमारोमात भिनवला. याचा अनुभव आपण सगळेजण आज घेत आहोत !

अभ्यासक्रम नाही. ती आश्रमात किंवा मठात पिकत नाही. श्रद्धेचा काथ्याकूट करणाऱ्यांना श्रद्धा आणखीन गोंधळात टाकते. मूलत: श्रद्धेत गोंधळ, गडबड नाही. श्रद्धा हा जन्मजात अंतरंगात वाहणारा निर्मळ व न आटणारा झरा आहे. तो श्वासाइतका सहज आहे. तो मनाच्या आत असतो याचे भान फक्त निवडक लोकांनाच असते. श्रद्धा व्यक्त करायची नसते. ती व्यक्त होते. श्रद्धेला मुहूर्त नाही. जाणिवेचा धागा मनाशी जुळला की, श्रद्धा निर्माण होते. जाणिवेतले जाणतेपण आणि नेणिवेतले शहाणपण यांच्या घर्षणातून श्रद्धेची ठिणगी पडते. तेव्हा माणसाच्या लक्षात येते की, आपण सश्रद्ध आहोत. माती, पाणी, पिके, झाडे, वनस्पती, निसर्ग यांच्यावर असणारी भाऊंची श्रद्धा अवर्णनीय व शब्दातीत आहे. त्यामुळे आयुष्यभर ते शेती-मातीचे काम करीत राहीले आणि जगभर कंपन्या काढल्या त्या शेतीशी संबंधितच. मातीबद्दलची इतकी प्रचंड श्रद्धा भाऊंच्या अंतरंगात ठासून ठासून भरली होती की, तिच्या बाहेर जाण्याचा फारसा प्रयत्न त्यांनी कधी केला नाही. अपवाद फक्त आंध्रातल्या मार्बल खाणींचा. पण त्यातूनही ते लवकर सहीसलामत बाहेर पडले. यातून एक गोष्ट सिद्ध झाली ती म्हणजे, श्रद्धेला रंग-रूप नसले तरी ती गाढ असते आणि ती माणूस आपल्यासाठी देतो. भाऊंची मातीवरची श्रद्धा समाजाच्या व राष्ट्राच्या हितासाठी, कल्याणासाठी झटणारी होती. शेतकरी समृद्ध व्हावा हाच या श्रद्धेचा ध्यास होता. त्यामुळे आयुष्यभर ते मातीची पूजा करीत राहीले. ही यथार्थ श्रद्धा जाणतेपणातून आली होती. श्रद्धेला वय-लिंग,कुळ-गोत्र, जात-धर्म, आयुष्य कशाचेही सोयरसुतक नसते. तिची बांधिलकी मानवी उत्थानाशी जोडलेली असते. हल्लीच्या काळात माणूस स्वस्त झालाय. त्याला बाकीचे अनेक विषय बोलावतात व खुणावतात. पण श्रध्दावान माणसाचे तसे नसते. त्यामुळे श्रध्देचे कोडे काही केल्या सुटत नाही. भाऊंची मातीवर एवढी का श्रद्धा होती याचे उत्तर आजही कोणाला देता येईल असे वाटत नाही. हातात धरलेल्या लाल मातीने भाऊंचे एकट्याचेच नव्हे तर त्यांच्या जैन उद्योग समुहाशी जोडल्या गेलेल्या प्रत्येकाचे आयुष्य सोन्यासारखे उजळून टाकले, लखलखीत केले. त्यामुळे मुळात नीट विचार केला तर श्रद्धा हा जाणवणारा भाव आहे. 'मी' च्या सार्थ निरीक्षणातून श्रद्धा निर्माण व्हायला लागते. 'मी' भल्याभल्यांना शेवटपर्यंत समजत नाही. 'मी'

समजावून घ्यायला आयुष्य अपुरे आहे. 'मी' हा कायम गुरफटलेला आहे. तो कोणत्या ना कोणत्या निमित्ताने सतत आवरणाखाली वाढतो. पण भाऊ त्याला अपवाद होते. कारण ते सुखाच्या मागे धावत नव्हते. ओरबडलेल्या सुखाला दुःखाचे काटे लागलेले असतात हे त्यांना चांगले ठावूक होते. निसर्गाशी त्यांची खूप जवळीक होती. त्यातूनच ते मातीच्या प्रेमात पडले होते.

भाऊंनी स्वतःच एके ठिकाणी असे लिहून ठेवले आहे. "निसर्गाने मला जगण्याचे अर्थ शिकविले" एका अर्थाने निसर्ग हाच भाऊंचा गुरु होता. जुने पान नाहीसे होऊन जेव्हा नव्या पानाला अंकुर फुटतो तेव्हा जगणे किती सुंदर असते याचे ते प्रात्यक्षिक असते. पानाचे फार महत्वाचे वैशिष्ट्य आपण पहा. जन्माला येतानाही पान हसरे असते आणि शिशिर ऋतूत पानगळ होतानाही पान हसरेच राहते. पानाला चांगले माहीत असते की, जीवनात आलेला प्रत्येक क्षण आपल्याला सुंदर करावयाचा आहे. असा क्षण सुंदर होऊन जगणे हे माझे जीवनाचे ब्रीदवाक्य असले पाहिजे. सुंदर जगणे याचा अर्थ साऱ्यांना बरोबर घेऊन समभावाने जगणे. पानाला माहित असते की, आपल्या आसपास दलदल खूप आहे. आपल्या वाटेत अकारण काटेही खूप पसरले आहेत. कधी कधी निरागस कोमल फुलांना काटयावरही झोपावे लागते. वादळ-वाऱ्याच्या जोशात मोठमोठे वृक्ष कोसळतात. नद्यांना महापूर येतात. अवकाळी गारपीट होते. मध्येच उष्णतेची लाट येते. थंडी येते. अचानक पाऊस पडतो. हे सगळे जीवनाचे चढ-उतार पानाला माहीत असतात. तरीही हे सारे पान सोसते ते मातीतल्या मायेपोटी



माती पानाची 'माय' आहे. पानाला पक्के माहीत आहे की, मी जगतो ते मातीच्या शुद्ध पान्हयावर हा पान्हा जर मी शुद्ध ठेवला नाही तर माझ्या पानांची पुढची पिढी सकस होणार नाही. आजचा जगण्याचा कस पान ओळखून आहे. म्हणून प्रत्येक वृक्षाचे प्रत्येक पान मातीशी इमान राखते आणि आकाशाचा आदर करते. ही जगण्याची विराट वृत्ती चिरंजीव करते. विश्व कितीही मोठे असो, परंतु विश्वाला पानाशिवाय शोभा नाही. विश्व खुलते ते पानांच्या हिरवाईतून आणि विश्व अधीर होते ते शिशिर ऋतुच्या पानगळीतून. कारण पानगळीच उद्याची पाने हिरवे डोळे घेऊन विश्वाला हसवितात. हाच जबरदस्त विश्वास पानांपाशी असतो. हेच पानांचे सामर्थ्य असते. पान फांदीला सांभाळते. फांदी डहाळ्यांना सांभाळते. या साऱ्यांना वृक्षाचे मूळ सांभाळते ही सारी मुळे मातीच्या घरात न भांडता सुखाने राहतात. माती हा सगळ्यांचा जगण्याचा आधार आहे. निसर्गाचा जगण्याचा आणि त्याला जीवंत ठेवण्याचा माती हाच श्वास आहे. हे जगणे जर माणसाला कळले तर माणसाला सुखी माणसाच्या सद-याच्या शोधात जाण्याचे कारण नाही तो स्वतःच अनेकांना सुखाचे सदरे शिवून देईल.

जे माझ्यापाशी आहे किंवा जे माझ्यात आहे ते मला उदार मनाने इतरांना देण्याचे वाटण्याचे साहस करता आले पाहिजे. तशी आस लागली पाहिजे. असे जो करतो तो खरा जगतो. हा गुणधर्म मातीचा आहे.ती आपल्या जवळचे सगळ्यांना भरभरून देते. म्हणूनच एका ज्वारीच्या दाण्यातून जे भरगच्च



# मातीवरच्या प्रेमाला ज्ञानाची झालर

मातीवरील अलोट व अस्सीम प्रेम हाच भाऊंच्या कामाचा गाभा होता. प्रेम याचा अर्थच व्यापकता असा आहे. मनाची संकुचितता लोपून भेदभाव मावळल्यावरच प्रेमाचा साक्षात्कार होतो. ज्यात कोणताही द्वैतभाव संभवत नाही ते प्रेम. विविध आविष्कारांतील प्रेममय एकता अनुभवण्यासाठी अंतरीच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान होणे आवश्यक आहे. भेदभावापोटी उपजणा-या संकुचिततेतून विमुक्त होऊन आपल्या सहज व्यापकतेची जाणीव होण्यासाठी ज्ञान हेच एकमेव साधन आहे.

**एथ अविद्यानाश हें स्थळ । तेणें मोक्षोपादान फळ**
**ययां दोहीं केवळ । साधन ज्ञान ।। १८. २४३ ज्ञानेश्वरी**

असे ज्ञानाचे अनन्यसाधारण महत्व आहे. भाऊंचे मातीवरचे प्रेम हे आंधळे नव्हते. ते ज्ञानाधिष्ठित होते. माती सुद्धां ज्ञानमय आहे. कलागुणांचा आदर, सन्मान करणारी आहे आणि सत्यासाठी असत्याबरोबर निकराने लढणारी आहे, याची भाऊंना परिपूर्ण कल्पना होती. त्यामुळेच या दोन सत्यवानांची गाढ आणि गूढ अशी मैत्री जमली होती. त्यांचा एकमेकांशी अनेकदा संघर्षही झाला. नेहमीच दोघांचे विचार व मते एकमेकांना पटली असेही झाले नाही. जट्रोपाची (एरंडी) लागवड करून मातीच्या मनाविरुद्ध वागण्याचा भाऊंनी जेव्हा प्रयत्न केला तेव्हा मातीने प्रखर संघर्ष करून तो प्रयत्न हाणून पाडला. पण तरी देखील दोघांचे एकमेकांवरील प्रेम तसूभरही कमी झाले नाही. भाऊंच्या नवनव्या प्रयोगांना, कल्पकतेला, सर्जनशील निर्मितीला आणि प्रतिभासंपन्न, विचारांना गगनभरारीसाठी पंख मातीनेच दिले हे आपल्याला कधीही विसरता येणार नाही. त्यामुळेच जळगावच्या गर्द पिवळ्या सोनेरी 'ग्रॅडनैन केळींना जगाची बाजारपेठ दाखविण्याचे भाऊंचे स्वप्न पूर्ण होऊ शकले हे आपल्याला कायम ध्यानात ठेवावे लागेल!

कणीस तरारून बाहेर येते त्याला हजारो दाणे लगडतात. ही मातीची देण आहे. म्हणूनच संतांनी म्हटलंय,

**"मातीचा केला पशुपती । परी मातीसी काय महती ।
माती माती माजी सामावे। देवपूजा देवासी पावे"॥**

याचा अर्थ असा आहे, 'मातीची एखादी मूर्ती तयार केली तर माती मातीमध्ये सामावून जाते पण केलेली भक्ती ही देवाला पावते. आपल्याला सोनेरी दाण्यांनी भरगच्च लगडलेलं जे जोंधळ्याचे कणीस मिळते ती मातीची आपण केलेली भक्ती ईश्वराला पावल्याची आंतरिक खूण असते. भाऊंना हे बरोबर कळले होते. त्यामुळे आयुष्यभर त्यांचा व्यवहार माणसांशी तसाच होता. रोज कुणाला ना कुणाला काही वाटले नाही असा एकही दिवस भाऊंच्या आयुष्यात नसेल. ही शिकवण मातीची आहे. ती रोज कणभर का होईना पण काही ना काही तरी कुणाला निश्चित देते. पान स्वतःसाठी जगत नाही. पान फुलासाठी जगते, आणि फूल फळासाठी जगते. ते कधीही आपल्यासाठी फळे खात नाही. त्याचे देणे हेच विठ्ठलाचे देणे असते. तो जेव्हा पिकातून बोलतो, तो जेव्हा फळातून बोलतो तेव्हा, एका अर्थाने तो माझ्या आत्म्याच्या



*बैल पोळ्याचा सण सालकरी, सहकारी व नातवंडे यांच्यासमवेत आनंदाने पारंपारिक वेष परिधान करून साजरा करताना मोठे भाऊ*

त्याने तो आणि आपण असे दोघेही समाधानाने भरून पावतो. मोठ्या भाऊंचा स्वभाव नेमका असा मातीसारखा म्हणजे उदार हाताने सारे काही वाटण्याचा होता. वाटण्यात त्यांनी कधी कंजुषी केली नाही आणि दुजाभावही बाळगला नाही. मुक्त हस्ताने वाटण्यामुळे त्यांचे जगणे हे खरे जगणे झाले. जगणे कुठल्याही श्रीमंतीत नसते. तुमच्यापाशी किती आहे आणि काय आहे ? याचा जगण्याशी काहीही संबंध नसतो पण माझ्या श्वासातून मी किती जणांना सुखी केले किंवा किती जणांना आधार दिला, यातच खरे माझे जगणे असते. चैतन्याचा गाभा असतो. हे चैतन्य भाऊंसारखे जर आपल्या प्रत्येकाला कळले तर आपले जगणे किती सुंदर होईल हे सांगायला मला शब्द शोधावे लागतील.

ख्यातनाम गीतकार कै. ग.दि.तथा अण्णासाहेब माडगुळकर यांचे 'तीळ आणि तांदूळ' नावाचे व्यक्तिचित्रांचे पुस्तक आहे. त्यात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांचे व्यक्तिचित्र उभे करताना अण्णासाहेबांनी मातीची जी महती वर्णन केली आहे ती अत्यंत विलक्षण आहे .अण्णासाहेब लिहितात "वसंतरावांच्या स्वतःच्या

मुलखात त्यांच्या शेतीची विलक्षण ख्याती आहे. कर्त्या शेतकऱ्याने वाटेवर थांबून निरखावे असेच त्यांचे शिवार आहे. ती एक उघडी प्रयोगशाळाच आहे. वसंतरावांच्या सहवासात आलेल्या माणसालाही थोड्याच वेळात पटते, की हा माणूस हाडाचा शेतकरी आहे. आभाळापेक्षाही त्याला मातीची मातब्बरी अधिक वाटते. आभाळ लहरी आहे. मातीला लहरीपणा माहीत नाही. आभाळ बरसेल, न बरसेल. माती मात्र राबणाऱ्याच्या हाती केवळ अपयश ठेवणार नाही. काहीतरी देईलच देईल. आज देणे साधले नाही तर उद्या देईल. नित्यनवी निर्मिती हा मातीचा धर्म. सगळेच श्रम वाया जातील कसे ? पेरलेले जपले तर ते भराला आलेच पाहिजे. देव धोका देईल. पण किती वेळ ? कधी ना कधी श्रमाचे फळ मिळालेच पाहिजे. मातीची मशागत माणसाच्या स्वाधीन आहे. आभाळाचा आशीर्वाद साठविण्याचे सामर्थ्यही मातीच्या अंगी आहे. हात आणि बुद्धी वापरून माणसाने मातीची मशागत केली पाहिजे. निसर्गावरच मदार ठेवून भागणार नाही. " [पान नं. १६२-१६३ ].

संत ज्ञानेश्वरांनी देखील ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायात हाच दृष्टांत दिला आहे. त्यांनी लिहिलयं,

**"मुडाहूनी बीज काढीले। मग निर्वाळलिये भूमी पेरीले।**
**ते सांडी विखुरी गेले । म्हणों ये कायी।।"**

राख व कडुनिंबाची पाने घालून शेणाने सारवून बंद करून ठेवलेल्या डूरकुलातून पेरण्यासाठी जतन करून ठेवलेले बियाणे चांगल्या नांगरून भुसभुशीत केलेल्या मातीत पेरले म्हणजे ते वाया गेले असे म्हणता येईल का? चांगला पाऊस पडला आणि वाफसा स्थिती कायम राहिली तर पीक जोमदार येते. त्यासाठी माती आणि बियाणे दोन्हीही चांगले कसदार असले पाहिजे. कसदार शब्दालाही त्याचा स्वतःचा एक अर्थ आहे. तो सगळ्यांना कळतोच असा नाही. प्रत्येक जण आपापल्या सोयीने कसदार शब्दाचा अर्थ लावतो. पण सार्वजनिक हितासाठी व समाजाच्या कल्याणासाठी जेव्हा कसदारपणा स्वीकारण्याची पाळी येते तेव्हा अनेकांचे हातपाय लटपटतात आणि मूळातूनच आचार विचाराने जे कसदार असतात तेच या शब्दाचे मोल टिकवून धरतात. अशी माणसे फार थोडी असतात. पण त्यांच्यामुळेच कसदारपणाला अलौकिक मूल्य प्राप्त होत असते. मोठे भाऊ असे खणखणीत कसदार होते आणि शेवटपर्यंत त्यांचे पाय मातीवर होते. म्हणूनच त्यांना समईतल्या प्रकाशासारखे निर्मळ जीवन जगता आले आणि निसर्गाची सगळी रूपे पाहून त्या त्या ऋतुतला निसर्ग वाचता आला. एवढेच नव्हे तर जळगावात जैन हिल्सच्या रुपाने संपूर्ण जगाला हेवा वाटावा असा मेहनत व कल्पकतेची सांगड घालून स्वतःचा अनुपम्य असा निसर्ग भाऊंना उभा करता आला ही देखील मातीचीच देण आहे हे लक्षात असू द्या.



*भाऊ म्हणायचे निसर्गातच मन संतुलित व प्रफुल्लित राहते याचा मी रोज अनुभव घेतो.*

अगोदर पाण्याचा थेंब नसलेल्या या दगडगोट्यांच्या खडकाळ माळरानावर माती निर्माण करण्याचे स्वप्न पाहून त्यासाठी अविरत कष्ट व प्रयत्नांची पराकाष्ठा केलेल्या भाऊंना मातीच्या वेडानेच स्वप्न निसर्गाची सुंदर वाट दाखविली. थेंब थेंब पाण्यातून खडक फोडून त्यांनी अगोदर माती तयार केली आणि मग त्यावर निसर्ग उभा केला. मोठ्या भाऊंच्या या मेहनतीतून आपण सर्वांनी एक गोष्ट शिकली पाहिजे ती म्हणजे, अनुभवाशिवाय निसर्ग वाचता येत नाही. त्यासाठी मनाची खिडकी सतत उघडी ठेवावी लागते. दररोज निसर्गात होणारे बदल अभ्यासावे लागतात. माणसाने शारीरिक

तंदुरस्तीसाठी औषधे निर्माण केली, पण मन आणि शरीर या दोघांना संतुलित ठेवण्याचे काम निसर्गाने केले. निसर्ग हे दिव्य औषध आहे. तसाच तो माणसाचा मित्र आहे. हे भाऊंना पक्के कळले होते. त्यामुळे पक्ष्यांची पहाटेची किलबिल सुरू झाली आणि सूर्याची सोनेरी किरणे डोंगर रांगांमधून बाहेर येण्यासाठी फडफडू लागली की भाऊंचा जीवही घराबाहेर पडून निसर्गात जाण्यासाठी कासावीस होत असे. घरचे म्हणत, थोडं थांबा. अजून चांगले उजाडू द्या. पण ते ऐकण्याची भाऊंची मनस्थिती कुठे होती? "माती असशी, मातीत मातीने सारवलेली जमीन आज व आता सर्वत्र मिळणे शक्य नाही आणि ती ठेवण्याचा वेडेपणा कोणीही करणार नाही. पण मातीचे अंगण आपल्याला निर्माण करता आले पाहिजे. इतकेच नव्हे तर आपल्यापुरते हे अंगण सारवलेले, स्वच्छ शुद्ध करून विवेक व चारित्र्याची रांगोळी काढलेले असले पाहिजे. इथे विवेक आणि बुद्धीचा कस लागतो. मातीचा कस जसा महत्वाचा आहे आणि त्याच्यावरच जसा निर्मितीचा दर्जा व सकसपणा अवलंबून आहे तीच गोष्ट बुद्धी व विवेकाची आहे, हे भाऊंनी अचूक जाणले होते. त्यामुळे सारासार विचार



*विचारांनी सुदृढ असलेले घर भाऊंनी स्वत:पुरते तरी शेणामातीने सारवलेले होते*

मिळशी" या अनावर वृत्तीने त्यांना झपाटले होते. झपाटयाने घराबाहेर पडून मंद हळूवार पाऊले टाकत माती, झाडे, पीके, पाने, फुले, सहकारी यांच्याशी संवाद करीत-करीत ते जैन हिल्सचा अख्खा कोपरा पिंजून काढीत. त्यामुळे त्यांची वाढ निसर्गातच झाली. माणसाची वाढ वाढदिवसाच्या अंगाने व तो साजरा केल्याने होत नाही. तो निसर्गाशी किती एकरूप होतो आणि मातीशी किती व कसा खेळतो यावर त्याचे माणूसपण ठरते. याचा अर्थ, सुधारणा, विकास आणि निसर्ग यांचा समतोल राखता आला पाहिजे. भौतिकतेचा विचार सर्वांनी जरूर करावा. पण तेच केवळ ध्येय असू नये. शेणा- आणि सर्वसमावेशकता हे मातीचे गुण त्यांनी चांगलेच अंगी बाणवून घेतले होते.

प्रयोगशाळेत आपण मातीचे परीक्षण करतो. तिचा सामू तपासतो. कोणत्या अन्नघटकाची कमतरता आहे, आधिक्य आहे हे ही तपासतो. पण मातीचा विवेक कधी तपासत नाही. वास्तविक मातीचा विवेक कायम शाबूत असतो. त्यामुळे ती सर्वसमावेशक आहे असे वाटत असले तरीही कोणाला किती मर्यादिपर्यंत सामावून घ्यायचे आणि वाढू द्यायचे याचे तारतम्य मातीला चांगले असल्यामुळे ती फाजील लाड कोणाचेही करीत नाही. नको त्या गोष्टींना बाहेर फेकून ती

# भाऊंची मातीशी सामरस्यानुभूती म्हणजे जळगावचे जैन हिल्स!

माती हाच आपल्या शेती व जीवनाचा आधार आहे हे अचूक ओळखलेल्या भाऊंनी मातीची शुद्धता कायम जपून तिची गुणवत्ता कशी वाढत जाईल याकडे सातत्याने लक्ष दिले. जमिनीतला सेंद्रीय कर्ब वाढविल्याशिवाय माती अधिक उपजावू होणार नाही हे सुरुवातीपासूनच ध्यानात घेऊन भाऊंनी झाडाचा पडणारा पालापाचोळा, शेतात व जमिनीवर उगवणारे गवत, तण, झाडे झुडपे, त्यांच्या फांद्या, काड्या या जागेवरून न उचलता पडत्या जागीच कुजू दिल्या. त्यामुळे मातीला सेंद्रीय खत उपलब्ध झाले. गांडूळ खतेही तयार करून त्यांनी ते मातीत मिसळले. त्यामुळे माती अधिक मोकळी, सुट्टी सुट्टी व भुसभुशीत झाली. त्यातून तिच्या निर्मल अथांगतेचे आणि प्रतिभा संपन्न निर्मिती सामर्थ्याचे व सत्य स्वरूपाचे दर्शन घडले. हे दर्शन इतके लोभस आणि विलोभनीय होते की त्यामुळे भाऊ मातीच्या प्रेमात गुरफटून गेले व वेगवेगळ्या पिकांचे प्रयोग करीत राहिले. ठिबक संचातून पडणारे थेंब थेंब पाणी आणि माती यांची त्यांनी अशी पक्की व सुंदर सांगड घातली ज्यातून मोत्यासारखे दाणे लगडून ते गुच्छाने बाहेर पडताहेत अशीच जणू प्रतीती येऊ लागली. निर्मिकाच्या भूमिकेत असलेल्या मातीच्या सामर्थ्याचे जे रूप भाऊंनी अनुभवले ते शब्द आणि मौन यांच्या पलिकडचे होते. जाणीव-नेणिवेच्या सापेक्षतेपलीकडे जाऊन तिच्याशी त्यांचे सामरस्य घडले. संत ज्ञानेश्वरांच्या भाषेत हे सांगायचे झाल्यास असे म्हणता येईल-

**"न बोलणेंहि न बोलोनि । तें बोलिजे तोंड भरूनि।**
**जाणीव नेणीव नेणोनि । जाणिजे जें।।१८, १२१४**
**तेथ बुझिजे बोधु बोधें । आनंद घेपे आनंदे**
**सुखवरी नुसधें । सुखचि भोगिजे ॥ १८-१२१५**

याचा अर्थ असा - या सहजस्थितीत बोधानेच बोधाला उमजावे, आनंदाने आनंदात विहरावे व सुखानेच सुखाला बिलगावे! मातीपासून प्राप्त झालेली ही सामरस्यानुभूती भाऊंच्या परतत्वस्पर्शाने उमललेल्या प्रतिभेनेच साकारली! त्याचे मूर्तिमंत रूप म्हणजे जळगावचे जैन हिल्स!



सहनशीलतेची मर्यादा दाखवतेच. मातीचा हा विवेकाचा गुण आपल्या सर्वांना भाऊंच्या ठिकाणी वसलेला कायम दिसत आला आहे. जीवनात विवेकाला प्रचंड महत्व आहे. वेदांताचा आरंभही विवेकापासून होतो. नित्यानित्य विवेक महत्वाचा आहे. बुद्धिपेक्षा विवेकाचे सामर्थ्य अधिक आहे. बुद्धीत आकलनाचे काहीसे सामर्थ्य दिसते. विवेकात पृथःकरणाला महत्व आहे. बुद्धी धारणेशी निगडीत आहे. विवेक चिंतनाशी संबंधित आहे. बुद्धी विजेसारखी आहे. विवेक समईसारखा आहे. बुद्धी कधीकधी विचाराच्या कड्यावरून कोसळते. विवेक कोणत्याही परिस्थितीत कोसळत नाही. बुद्धी स्वार्थपरायण असण्याची दाट शक्यता असते. विवेक निःस्वार्थतेच्या अवकाशात खुलतो. बुद्धीला अहंतेची बाधा कळत-नकळत लवकर होते. विवेक अहंतेवर मात करतो. बुद्धीला नम्रतेचे भान असते. विवेकात नम्रता गृहीत असते. बुद्धीतून जगण्याची समीकरणे बाहेर पडू शकतात. विवेकात जीवनाच्या समीकरणांचे निरपेक्ष विश्लेषण असते. बुद्धी स्वतः साठी पक्षपाती होऊ शकते. विवेक पक्षपाताच्या अतीत असतो. बुद्धीचे निर्णय मर्यादितून घेतले जातात. विवेकातून घेतलेला निर्णय जीवनाचे मूल्य होतो. बुद्धीचे सामर्थ्य कधीकधी कळत नाही. विवेकातून बुद्धीच्या सामर्थ्याचे साधार विवेचन करता येते. बुद्धी जाणिवेला कधीकधी बाजूला सारते. विवेक जाणिवेला प्राधान्य देतो. सद्सद्-विवेकबुद्धी मिळवायला विवेकी व्हावे लागते. बुद्धीतले तारतम्य लक्षात आले की, विवेक निर्माण होतो. गीतेतील बुद्धी योग शेवटी विवेकात लीन होतो. विवेक कसा करायचा आणि तो कसा सांभाळायचा याचे आदर्श व उत्तुंग उदाहरण म्हणजे मोठ्या भाऊंचे जीवन आहे. त्यांनी लिहिलेले ग्रंथ हा विवेकाचा नमुना आहे आणि दिलेली भाषणे ही विवेकाची प्रयोगशाळा आहे. इतकेच नव्हे तर उभी केलेली कारखानदारी ही बळीराजाच्या विश्व साम्राज्याची ध्वजा म्हणून दशदिशांना डौलाने फडकते आहे. इथे भाऊंच्या कार्यकर्तृत्वाचा प्रचंड आवाका दिसतो पण तो ज्या मातीतून निर्माण झाला तिच्या सर्व बहुरंगी अणुरेणूंचे दर्शन आणि संपूर्ण आकलन मात्र होत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच प्रत्येकाला एकच प्रश्न पडतो एका आयुष्यात एवढी प्रचंड दैदीप्यमान कामगिरी भाऊंना कशी करता आली ? हा प्रश्न अर्थात शेवटपर्यंत अनुत्तरीतच राहणार आहे.





*जळगावात उभी केलेली प्रक्रिया कारखानदारी*

माती सजीव असते. तिलाही भावभावना असतात. तिही हसते रुसते, फुगते, घट्ट रुतून बसते. कधी कधी मनमोकळी होऊन आकाशात वावटळींच्या रूपाने वरपर्यंत जाऊन भटकून येते. तर कधी वाऱ्याच्या वेगाबरोबर, पाण्याच्या, पुराच्या प्रवाहाबरोबर गाव सोडून निघूनही जाते. जमीन स्थिर असली तरी माती स्थिर असेलच असे खात्रीने सांगता येत नाही. मातीला कधी कोण खणून, उचलून, भरून घेऊनही जाईल हे सांगता येत नाही. त्यामुळे माती जोवर एका जागी आहे तोवर ती आपल्याशी संवाद करीत असते. फक्त हा संवाद कळण्यासाठी आपले मन तितके जागृत असले पाहिजे. आपले निरीक्षणही पक्व आणि संवेदनशील असले पाहिजे, म्हणजे मातीच्या मनातला भाव, तिला काय हवे, नको ते ओळखता येते. तिचा संवाद मौन असतो. 'शब्देविण संवादिजे, इंद्रिये नेणता भोगिजे' अशी ती अवस्था असते. मौन संवादातूनही आपण आपल्याला उकलत जातो. आपले उकलणे हे एका अर्थाने उमलणे असते. बोलण्यातून अधिक उमलतो. भाऊ जेव्हा सकाळी फिरायला निघत, तेव्हा जाताना वाटेत माती, वनस्पती, पाने, फुले, पशुपक्षी, माकडे, झाडे, पिके, झरे, यांच्याशी त्यांचा जो संवाद चाले

*भाऊंची विचारसंपदा चिरंतन असून पुढील पिढ्यांना मार्गदर्शन आहे.*





# श्रेष्ठ कोण, माती की माणूस?

माणूस की माती यात श्रेष्ठ कोण असा प्रश्न जर विचारला तर बहुतांश लोक 'माणूस श्रेष्ठ आहे' असे उत्तर देतील. पण हाच प्रश्न भवरलालजी जैन उर्फ मोठेभाऊ यांना विचारला असता तर त्यांनी माणसापेक्षा माती श्रेष्ठ आहे असे निश्चित सांगितले असते. कारण मातीची अंगभूत सामर्थ्य त्यांनी अचूक ओळखलेले होते. जगातल्या ९०० कोटी लोकांना रोज दोन वेळच्या जेवणासाठी लागणारे अन्नधान्य, फळे, भाजीपाला पुरविण्याचे काम माती करते. मातीपासून उत्पादन झालेच नसते तर माणसाला खायला अन्नधान्य कोठून मिळाले असते? माणसाने नुसते बी-बियाणे मातीत पेरून उपयोग नाही. त्या बियाण्याच्या उगवणीपासून प्रत्यक्ष पिकाचे दाणे माणसाच्या हाती येईपर्यंत त्या पिकाचा सांभाळ माती करते. मातीतून पिकाला लागणारा अन्नरस कणसाच्या, लोंबीच्या किंवा ओंबीच्या टोकापर्यंत जातो. हा अन्नरस मातीने वर पिकाकडे न पाठविता खाली जमिनीतूनच पाझरून टाकला असता किंवा पाण्याबरोबर वाहून जाऊ दिला असता तर पीक कसे आले असते? माणसाने नुसती खते, औषधे, बी-बियाणे, पाणी टाकून उपयोग नाही. ते सर्व कष्ट व प्रयत्न पूर्णत्वाला नेऊन फलदायी करण्याचे काम माती करते. मातीने हे कर्तव्य करण्याचे टाळले तर काय होईल? या कर्तव्यपूर्तीसाठी मातीला पाणी मदत करते. म्हणून मातीचा जीवाभावाचा सखा पाणी असतो. प्रसिद्ध गीतकार व कवी ग.दि. माडगुळकर यांनी 'संथ वाहते कृष्णामाई' या गीतामध्ये लिहीलेल्या पुढील ओळी किती समर्पक आहेत आणि मातीचे महात्म्य कथन करणाऱ्या आहेत.

**"सतत वाहते उदंड पाणी ।**

**कुणी न वळवूनी नेई रानी।।**

**आळशास व्हावी कैसी।**

**गंगा फलदायी"**



*आहेच मी असा, एकटा एकटा राहणारा आणि वाळकं पान गळतांना तन्मयतेनं पाहणारा*


विचारात पडलोय, कोणत्या मेहनतीचं हे फळ आहे?

तो अतिशय विलोभनीय, जीवंत आणि द्रष्ट लागावी व नवल वाटून आश्चर्याने बोटे तोंडात जावीत अशा प्रकारचा होता. पहाटे पाचला सुरू झालेला संवाद सकाळी ब-याचदा नऊ-साडेनऊ पर्यंत चालत असे. कधी कधी या संवादात ते इतके तल्लीन होऊन जात की नाश्ता करण्याचे भानही त्यांना राहात नसे. निसर्गाशी त्यांचा हा जो संवाद चालायचा त्याला स्वामी विवेकानंदांच्या भाषेत 'गुरुशिष्यांचा बोधभावी संवाद' असे म्हणता येईल. तर संत ज्ञानदेवांच्या भाषेत त्याला 'संतांची संगत' अशी उपमाही देता येईल. संवादातून आपण कुठवर चालू शकतो आणि आणखीन किती काळ चालून किती अंतर कापावयाचे आहे याची मनोमन जाणीव भाऊंना होत असे. त्यातून पुढच्या कामाची व नियोजनाची ब्ल्यू प्रिंट आखली जात असे. मातीच्या संगतीने चालताना धीर मिळतो. पुढच्या कामाची दिशा समजते. त्यातून अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतात असे भाऊ नेहमी म्हणायचे. पण आज जेव्हा या विधानांचा मी विचार करतो तेव्हा मला असे वाटते की मातीशी व निसर्गाशी केलेल्या संवादातून त्यांना द्दष्टेपण प्राप्त झाले. त्यांच्यातला द्दष्टा घडला. एकाग्रता हे भाऊंच्या सगळ्या कामाचे प्रमुख अंग होते. आज जगात जे जे ज्ञान आढळते ते ते सारे मानवाच्या एकाग्रतेतून निर्माण झालेले आहे. आपण एकाग्रतेने काम केले तर, विश्व आपली अनेक रहस्ये उलगडून दाखवायला तयार आहे याचा अनुभव भाऊंनी 'याचि देही याची डोळा' घेतला. खरं तर मानवी मनाच्या निरीक्षणाच्या बाबतीत एकाग्रता होणे कठीण आहे. मनाच्या विविध शक्ती विविध पातळ्यांवर वावरत असतात त्यांना एकत्र करणे दुर्लभ आहे. भाऊंचे हेच मोठे वैशिष्ट्य आहे की महत् प्रयासाने त्यांनी या सर्व शक्ती एकत्र केल्या.

त्यातून आत्मरूपाच्या गाभ्याचा प्रत्यय त्यांना आला. एकाग्रतेतूनच हे घडू शकले. तुम्ही आस्तिक असा की नास्तिक असा, तुमच्या कृतीतील एकाग्रता तुम्हाला पुढे नेते हाच भाऊंच्या जीवनापासून आपण घ्यायचा संदेश आहे. आपण जेव्हा आपल्या मनाला असे का? असा प्रश्न विचारीत राहू तेव्हा आपण आपल्या एकाग्रतेची क्षमता मोजत आहोत याची खूणगाठ बांधा. यासाठी पडतील ते कष्ट करण्याची तयारी ठेवा. स्वतःला जोपर्यंत आत्मानुभव येत नाही तोपर्यंत खूप झगडावे लागते. पण त्यानंतर जे सत्य गवसते ते स्वतःच्या पायावर उभे राहते. त्याला धरून उभे करण्याची आवश्यकता पडत नाही. ही साधना दीर्घ आहे. संयमशील मनाच्या साधनेतूनच ती पुढे जाते. अशी साधना भवरलालजींनी आयुष्यभर केली म्हणून त्यांच्या जीवनाचे सोने झाले आणि जगभर त्यांनी मोठ्या मेहनतीतून उभ्या केलेल्या जैन इरिगेशन कंपन्यांचा नावलौकिकही झाला. या नावलौकिकाच्या छत्रछायेखाली व सावलीत आज आपल्याला काम करायची संधी मिळते आहे हे आपले भाग्य आहे. तेव्हा आपण सारेजण मिळून एकजुटीने खांद्याला खांद्या लावून काम करण्याचा संकल्प भाऊंच्या जन्मदिनाच्या निमित्ताने करून पुढील वर्षभर त्याच विचाराने काम करूया. तिच भाऊंना वाढदिवसाची आपण दिलेली भेट असेल! ती त्यांना निश्चित आवडेल!

# भवरलाल भाऊ माझे सांगाती


## शरद पवार
(खासदार, व माजी केंद्रीय मंत्री, भारत सरकार)




माझा खरा आणि मुळ पिंड उद्योजकाचा. पण मी राजकारणात गेलो आणि तिथेच रमलो. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे कामाचे सूत्र. मा. यशवंतराव चव्हाण साहेबांकडून शिकलो व त्याच्या भोवतीच फिरत राहीलो. लोकांना भेटणे, त्यांच्याशी बोलणे, त्यांचे प्रश्न व माहिती समजून घेणे, कुणावर अन्याय होत असेल तर त्याविरूद्ध आवाज उठविणे हा माझा स्वभाव बनला म्हणा किंवा कामाची पद्धत बनली म्हणा. पण मला सुरूवातीपासूनच व्यवसायाची, उद्योजकांची आणि शेतीची आवड असल्यामुळे उद्योजकाबद्दल आदर, कुतूहल व जिज्ञासा वाटत आली आहे. त्यातूनच माझी अनेक उद्योजकांशी, व्यावसायिकांशी जवळीक निर्माण झाली. त्यांच्याबद्दल आपुलकी वाटू लागली. त्यांच्या अडचणी सोडवाव्यात, संकटकाळी मदतीला धावून जावे आणि नवीन कोणी काही करीत असेल तर त्यामागचे शास्त्र, संशोधन, ज्ञान, तंत्रज्ञान आणि यशस्वीतेचं गणित व इंगितही समजून घ्यावे असा प्रयत्न मी सातत्याने करीत आलो. त्यातून असंख्य उद्योजक माझे मित्र झाले. त्यांच्याशी ऋणानुबंधाचे संबंध जोडले गेले. काही मोजकेच जवळचे सांगाती झाले. या सांगातीमधले एक नाव - म्हणजे जळगांवचे भवरलाल भाऊ. त्यांची माझे मोठे बंधू डॉ. आप्पासाहेब पवार आणि माजी केंद्रीय कृषी राज्यमंत्री डॉ. आण्णासाहेब शिंदे यांच्याशीही जवळची मैत्री होती. मैत्रीचा तो एक त्रिवेणी संगम होता. प्रत्येकाचे एकमेकांवर प्रचंड प्रेम होते आणि मुख्य म्हणजे त्यात कुणाचाही स्वार्थ दडलेला नव्हता. त्यामुळे निरपेक्ष व निर्व्याज अशी ती मैत्री होती. भवरलालजींशी माझी असणारी मैत्रीही तशीच होती. किंबहुना त्यामुळेच आम्ही दोघे एकमेकांशी स्पष्ट व परखडपणे बोलत असू आणि प्रसंगी एकमेकांच्या चुका व गुणदोषही निदर्शनास आणित असू. पण या स्पष्टवक्तेपणामुळे आमच्या मैत्रीतले प्रेम दिवसेंदिवस वाढत गेले आणि माझे व मी त्यांचा कधी सांगाती झालो ते दोघांनाही कळले नाही.

अनेक लोक आपल्या प्रत्येकाला रोज भेटतात. राजकारणात तर लोकच माझे सांगाती आहेत. म्हणून माझ्या आत्मचरित्राचे नाव देखील 'लोक माझे सांगाती' असेच आहे. भेटीतून अनेकांशी परिचय होतो. काहींशी मैत्री होते. काहींबद्दल आपुलकी व जिव्हाळा निर्माण होतो. काहींशी घरातल्यासारखे जिव्हाळ्याचे व जिवाभावाचे संबंध निर्माण होतात. सतत त्यांच्याशी बोलावे, मनमोकळं करावे असे वाटत राहते. अगदी घरातल्या देखील सगळ्या माणसांशी सगळं काही मनमोकळेपणाने बोलता येत नाही. याचा अनुभव आपल्यापैकी अनेकांनी घेतला असेल. काही


शरद पवार यांच्याशी दिलखुलास गप्पा करताना भवरलाल भाऊ

निवडक व्यक्ती आणि मनेच अशी मोकळपणाने, खुल्यारितीने संवाद करावा अशी असतात व शेवटपर्यंत राहतात त्यात भवरलालजी होते. म्हणूनच ते माझे उत्तमातले उत्तम सांगाती होते. सगळे लोक आणि भेटणारा येणारा प्रत्येक जण उत्तम सांगाती होऊ शकत नाही. काही मर्यादांच्या चौकटीतच हे सांगातीपण टिकून राहते. पण भवरलालजींच्या बाबतीत तसे झाले नाही. त्यामुळेच त्यांना माझे आणि मला त्यांचे घर कधी परके वाटले नाही. आम्ही एकमेकांच्या घरी अगदी कुटूंबातले असल्यासारखे राहत आलो. आमच्या मैत्रीच्या अनेकांना हेवा वाटला, आर्श्चय वाटले. त्याबाबत कित्येकांनी आम्हां दोघांकडेही कुतूहलाने विचारणा देखील केली. परंतु मैत्रीला स्वार्थाची झालर नसल्याने त्यात कधीही दुरावा निर्माण झाला नाही. भवरलालजी यांचे निधन होऊनही (२०१६) आता जवळपास ७-८ वर्ष होत आली आहेत पण त्यांच्या कुटुंबांशी असलेले प्रेमाचे संबंध आजही कायम आहेत. त्यामुळे जळगांवला गेलो की आवर्जून मी त्यांच्या जैन हिल्सवर मुक्कामाला आणि १ नंबरच्या बंगल्यावर जेवायला जातो. भाऊंच्या आठवणींनी मात्र मन ओलेचिंब झालेले असते. अनेक आठवणी त्यावेळी दाटून येतात आणि आता भाऊ असते तर काय बोलले असते हा प्रश्नही मनात घर करतो.

आपल्या सगळ्यांना नेहमी एकमेकांना काही सांगावे असे वाटते. तसं वाटण्यात चूक काही नाही. उलट एकमेकांशी बोलण्याने मने बरीच मोकळी होतात. सांगणे सगळ्यांना प्रिय असते. त्यामुळे कित्येकांना कधी बोलू आणि किती बोलू असे होते. मला तर याचा रोज अनुभव येतो. काही माणसे तर सतत तेच तेच बोलत राहतात. शेवटी ऐकण्याचा कंटाळा आल्यामुळे पुढच्याला दारातून आत घेण्यासाठी नाईलाजाने बेल दाबावी लागते. काही प्रसंगी वेळेचाही प्रश्न असतो. कमी वेळेत अधिक माणसांना भेटायचे असते. त्यामुळे



*जैन हिल्सवर भाऊंच्या मुले आणि नातवंडांशी गप्पा करताना शरद पवार. त्यावेळी उपस्थित अशोक, अनिल, अजित व अतुल जैन*



जैन हिल्सवर ठिबक सिंचनावरील भात पिक शरद पवार यांना दाखवितांना अजित जैन सोबत भवरलाल जैन व सहकारी

सांगणाऱ्याला थोडक्यात सांगा असे सांगावेच लागते. आपण सारखे सांगत राहतो. सांगता सांगता जिवनाची सांगता होते; पण सांगणे काही संपत नाही. तथापि बऱ्याचदा जे खरे काही सांगायचे असते ते तसेच राहून जाते किंवा काही वेळा ते आपण सोयीस्करपणे विसरून जातो. बऱ्याचदा सांगताना नवीन काही सूचते. नंतर ध्यानात येते आपल्याला हे कसे सूचले? याला उत्तर सापडत नाही पण बहुतांश वेळेला नवीन गोष्ट आतून आलेली असते. पण हे आतून येते तरी कसे? याला उत्तर नाही. माझ्या आणि भवरलाल भाऊंच्या चर्चेत नेहमी असे घडते. ठरवून तर आम्ही कधीच काही बोललो नाही. कवीवर्य ना.धों. महानोर सोबत असतील तर गप्पा कशा आणि कुठे सुरू झाल्या व केंव्हा संपल्या हे देखील कळत नसे. साहित्यीक किस्से आणि गप्पांना त्यावेळी जो पूर यायचा तो अवर्णनीय होता. आता भाऊ आणि कवी दोघेही नसल्यामुळे त्यांच्या गप्पांना मी आणि माझी पत्नी (प्रतिभा) दोघेही मुकलो आहोत. गप्पांच्या ओघातले विषय आतून आलेले असायचे. आतून यायला आतले ऊन अनुभवाच्या अंगावर घ्यावे लागते. ते क्वचित येते. नंतर ध्यान लागते नि मग हळूहळू ध्यानात येते. ऐकता ऐकता आपल्यालाही कुणीतरी सांगाती लाभला आहे. तो मनापासून सांगतो आहे. आपणही मनापासून ऐकतो आहोत. सांगण्या-ऐकण्यातून एकमेकांच्या जवळ आलो आहोत. संवाद मनात भरत चालला आहे नि मैत्रीतून तो जीवनाचा अखंड, अनंत सांगाती झाला आहे. असे भवरलाल भाऊ आणि कवी महानोरांच्या बाबतीत मला नेहमीच होत असे. त्यामुळे ते भेटले की त्यांच्याशी बोलावेसे वाटे. त्यांना काही सांगावे, प्रसंगी चेष्टेने बोलावे असेही वाटे. सांगण्याचा भावार्थ खोलात उतरायला लागला की तो सांगाती होतो हा अनुभव मी भवरलाल भाऊंच्या संदर्भात अनेकदा घेतला आहे. म्हणूनच मी आवर्जून म्हणतो, 'भाऊ माझे सांगाती होते'. आजच्या शतकात व स्वार्थाने बरबटलेल्या जगात असे चांगले सांगाती मिळणे दुर्मिळ आहे. त्यासाठी काही तरी भाग्य लागेलच !

### आयुष्यभर शेतीचेच काम

१९६३ साली उपजिल्हाधिकारी म्हणून निवड झालेल्या व चांगली शासकीय नोकरी मिळविलेल्या भाऊंनी नोकरी न करता व न स्वीकारता उद्योग व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला आणि शेती व शेतीशी संबंधित व्यवसाय निवडला



*अमेरिकेत फळबागांची पाहणी करताना शरद पवार, सुरेशदादा जैन, कवी ना.धों. महानोर आणि अनील जैन*



याचे मला नवल वाटले. पण त्यांच्या शेतीवरील प्रेमामुळे माझी जास्त जवळीक निर्माण झाली. वास्तविक शेती हा आतबट्ट्याचा धंदा आहे. तो पूर्णपणे निसर्गाच्या कृपेवर अवलंबून आहे. त्यात दरवर्षी फायदाच होईल असे सांगता येत नाही. त्यात भाऊ पडले व्यावसायिक, मारवाडी जातीतले. या जातीचे एक मोठे वैशिष्ट्य आहे, 'पै अन् पैचा' हिशेब लावतात. नफ्या-तोट्याचे गणित सतत मोजत राहतात आणि बारकाईने व्यवहार करतात. त्यासाठी लागणारे प्रचंड श्रमही करतात. भाऊंनीही आयुष्यभर खूप मेहनत केली. कष्ट केले आणि त्या कष्टांना विचार, अभ्यास, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, नाविन्य, कल्पकता यांच्या बरोबरीने प्रामाणिकपणा, सचोटी व सेवाभावी वृत्तीची जोड दिली. त्यामुळेच त्यांचे कष्ट फळाला जाऊन 'जैन उद्योग समुहा'चा जगभर मोठा नावलौकिक होऊ शकला.

अमेरिका व अन्य देशांमध्ये आम्ही नवीन पद्धतीची शेती पाहायला आवर्जून गेलो. तेव्हा कवी ना. धों. महानोर, अनिल जैन, सुरेशदादा जैन, भवरलालजी व अन्यही काही लोक आमच्यासमवेत होते. आम्ही जेव्हा परदेशातल्या द्राक्ष, मोसंबी, सफरचंद, ॲव्हॅकडो, संत्रा या फळपिकांच्या बागा पाहिल्या आणि त्यांच्या उत्पादकतेची चौकशी केली तेव्हा ते उत्पादकतेत आपल्यापेक्षा कितीतरी पुढे आहेत आणि उत्पादकता अधिक असल्यामुळे उत्पादन खर्च कमी येतो व प्रक्रियेसाठी कमी किमंतीतही माल पुरविणे शक्य होते हे आमच्या लक्षात आले. भाऊ तर द्रष्टे उद्योजक असल्यामुळे ते बारकाईने फळांवरच्या प्रक्रीया, त्यासाठी लागणा-या जाती, उत्पादन होण्याचा कालावधी व बाजारात कच्चा माल किती काळ उपलब्ध राहील. यासंबंधीची माहिती सातत्याने व चौकस

बुद्धीने गोळा करीत होते. त्याबाबत परदेशी लोकांना माहिती विचारत होते आणि नंतर आमच्याशी आपापसात चर्चा करीत होते. परदेशात सर्व फळबागा आणि ऊसासारखे पीक ठिबक संचावर घेतात हे पाहून आम्हाला नवल वाटले. पाटाने पाणी देत नव्हते आणि थेंब थेंब पाण्यावर हिरवीगार झाडे मोठ्या दिमाखाने डौलत उभी होती हे चित्र पाहून हरखायला होत होते. क्षणभर त्याच्यावर विश्वासच बसत नव्हता. कधीतरी हळूच हे लोक पाटानेही पाणी देत असतील अशी शंकेची पाल मनात चुकचुकून जात असे. अनेकांच्या मनात ही शंका होतीच पण परदेशी माणसांना तो प्रश्न विचारण्याचे धाडस कुणी केले नाही. मात्र ते धाडस भवरलालजींनी केले आणि गोड बोलून माहिती काढून घेतली. ठिबक संचाने पाणी दिले तरच गुणवत्तेचा माल तयार होवू शकतो. पाट-पाण्यावर तशी गुणवत्ता येत नाही असे जेव्हा त्या परदेशातल्या शेतक-यांनी सांगितले तेव्हा क्षणभर स्तब्ध होऊन आम्ही एकमेकांकडे आश्चर्याने पाहिले. तेव्हा आमच्या सगळ्यांच्या मनात एकाच प्रश्नाने काहूर उठविले होते तो म्हणजे, आपण पाटाने किती खच्चून पाणी भरतो आणि पाण्याचा किती अपव्यय करतो

## जैनचा इस्त्राईलशी करार -

# शेतीतल्या क्रांतीला लाभली सुवर्ण झळाळी!

१९९३ साली इस्त्राईलमध्ये भरलेल्या 'अॅग्रोटेक' (अॅग्रेस्को) कृषि प्रदर्शनाला भारतामधून ७५० शेतकऱ्यांचे एक शिष्टमंडळ माझ्या नेतृत्वाखाली पाठविण्यात आले. तेव्हा मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होतो. प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी जैन इरिगेशन कंपनीच्या वतीने इस्त्राईलमधील ठिबक व तुषार सिंचनाचे तंत्रज्ञान पुरविणाऱ्या दोन कंपन्यांबरोबर करार होणार होते. या कराराच्या वेळी मी उपस्थित राहावे असा भवरलालजींचा आग्रह होता. इस्त्राईलचे कृषिमंत्रीही यावेळी उपस्थित राहणार आहेत असे मला सांगण्यात आले होते. त्यावेळी केंद्रात श्री. एस.एस. गिल हे कृषी सचिव होते. त्यांचाही मला निरोप आला की, जैन इरिगेशन कंपनी इस्त्राईलचे सुक्ष्मसिंचनाचे आधुनिक तंत्रज्ञान भारतात नेऊन त्याचा प्रचार प्रसार करणार आहे व भारतीय शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे नवे दालन उपलब्ध होणार आहे. त्यामुळे मी आवर्जून समारंभाला गेलो. आज मला हे सांगताना अतिशय आनंद होत आहे की, या कराराचा मी एक साक्षीदार आहे. भवरलालजींच्या प्रेमामुळेच या समारंभाला मला उपस्थित राहता आले हा माझ्या जीवनातला मोठा ठेवा आहे. जैन इरिगेशनने ठिबक सिंचनाच्या तंत्रज्ञानासंबंधी इस्त्रायली कंपनाऱ्यांशी जो करार केला त्यामुळे भारतीय शेतीला नवी सुवर्ण झळाळी प्राप्त झाली. उत्पादन व उत्पादकता तर वाढलीच पण निर्यातक्षम माल त्यामुळेच तयार होऊ लागला.



*इस्त्राईलच्या तेलअव्हीह शहरात कराराच्या प्रसंगी शरद पवार भाषण करताना शेजारी भवरलाल जैन, एम. एस. गिल*




## १० डिसेंबर ते १४ जानेवारी जळगावातील जैन हिल्सवर कृषि महोत्सवाचे आयोजन

शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठी जैन इरिगेशन कंपनीने मागील ६० वर्षात अनेक नवनवीन उपक्रम राबविले. संशोधनाचे प्रयोग हाती घेतले. जे यशस्वी झाले त्यांना पुढे नेऊन विकसित रूप दिले. जे अयशस्वी झाले त्यांच्या विकासासाठी अव्याहत सुधारणा व प्रयत्नांची पराकाष्ठा करीत राहिले. या अव्याहत प्रयत्नांमागे जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष राहिलेल्या भवरलालजी जैन (मोठेभाऊ) यांची प्रेरणा, कल्पकता, आस, दूरदृष्टी, श्रम, मेहनत, अभ्यास आणि सर्वांना बरोबर घेऊन अव्याहत धडपडण्याची वृत्ती होती. त्यातून एक सुंदर विश्व आज जळगावच्या जैन हिल्सवर व जगभरात अनेक ठिकाणी उभे राहिले आहे.

शेती क्षेत्रातील नाविन्यपूर्ण प्रयोग व संशोधनाचे हे विश्व मोठ्याभाऊंच्या जयंती निमित्ताने आपल्याला येत्या डिसेंबर २०२३ मध्ये पाहण्याची संधी उपलब्ध होणार आहे. १० डिसेंबर २०२३ ते १४ जानेवारी २०२४ या काळात जैन हिल्सवर आयोजित करण्यात आलेल्या या भव्य कृषी महोत्सवाला व शेतात उभ्या असलेल्या सुंदर पिकांना पाहण्यासाठी आपण आवर्जून या !

**या प्रदर्शनाला भेटीसाठी आजच आपले नाव नोंदवा. त्यासाठी खालील क्यू.आर. कोड स्कॅन करा.**

https://www.jains.com/farmers_meet/

# जळगावला जाण्याने





आता आपल्याला प्रश्न पडला असेल की हायटेक शेतीचा नवा हुंकार असलेल्या कृषी महोत्सवात आपल्याला नवीन काय बघायला मिळणार आहे ? कशासाठी मी जळगावच्या जैनहिल्सवर जायचे. याचे उत्तर आम्ही आता आपल्याला देणार आहोत. प्रत्यक्ष बघितले की विश्वास बसतो (Seeing is Believing) असे म्हणतात. शेतकरी तर सहजासहजी कोणावर विश्वास ठेवत नाही. का ठेवावा हा ही प्रश्न आहेच. प्रत्यक्ष पाहणे हेच त्याचे उत्तर आहे. त्यामुळे आपण आता जैन हिल्सवर नव्याने काय बघायला मिळणार आहे त्याचा धावता व संक्षिप्त आढावा येथे घेऊया! शेती क्षेत्रात जगात जे नव्याने तंत्रज्ञान विकसीत झाले आहे ते आपल्यापर्यंत पोहोचावे या उद्देशाने पिकांची प्रात्यक्षिके उभी केली आहेत.

गादीवाफ्यावर ठिबक संच बसवून एक डोळा पद्धतीने उसाची लागण केली आहे. उसाला क्रॉपकव्हर लावण्यात आले असून क्रॉपकुलिंग यंत्रणा बसविण्यात आली आहे. मार्च-एप्रिल-मे या काळात तापमान खूप वाढते. त्याचा विपरीत परिणाम पिक वाढीवर होतो. तो होवू नये म्हणून तापमान कमी राखणे गरजेचे असते. यासाठी पिकावर वरून मिस्टर (स्प्रिंकलर) लावले असून पिकात तयार होणारा कार्बनडाय ऑक्साईड वायू ($CO_2$) शेताच्या बाहेर न जाता पिकालाच मिळावा म्हणून ऊस पिकाच्या चारही बाजूने पॉली (प्लॅस्टिकचे कंपाऊंड) लावली आहे. पाच महिन्यांचा हा ऊस आज अत्यंत दिमाखाने उभा आहे.

साध्या सपाट रानात ठिबक संचावर लावलेली कपाशी, गादीवाफ्यावर ठिबक संचावर घेतलेली कपाशी, गादीवाफा, ठिबक आणि मल्चिंगवरची कपाशी, आणि पारंपारिक पध्दतीने प्रवाही पाण्यावर घेतलेली कपाशी अशा कापूस लागणीच्या वेगवेगळ्या पध्दती येथे पाहायला मिळतील. ठिबक मल्चिंग आणि गादीवाफा असा त्रिवेणी संगमावरचा कापूस दृष्ट लागून नजरेत भरावा असाच आहे.

# नव्या तंत्रज्ञानाचे गाठोडे लागेल हाती!



आंबा, चिकू, पेरू, सिताफळ, मोसंबी, संत्रा या फळझाडांची अतिसघन पद्धतीने गादीवाफ्यावर ठिबक संचावरती केलेली लागवड येथे दृष्टीस पडेल. झाडाच्या दोनी बाजूने ठिबकच्या नळ्या टाकल्या तर त्याचे रिझल्ट किती उत्कृष्ट मिळतात हे येथे लगेच दिसून येईल.

तापमान वाढ (ग्लोबल वॉर्मिंग) आणि हवामान बदल या दोन संकटांचा सध्या शेतकऱ्यांना वारंवार सामना करावा लागतो आहे. त्याचा मोठा फटका फळबागांना बसतो. तो बसू नये याकरिता शेडनेट, पॉलिहाऊस ग्रीनहाऊस यांसारख्या बंदिस्त व नियंत्रित वातावरणात बागा उभ्या करणे गरजेचे आहे. जैन हिल्सवर आपल्याला शेडनेट व इनसेक्टनेटमध्ये केळी, आंबा, जैन स्वीट ऑरेंज, संत्रा यांची केलेली लागवड पाहायला मिळेल. अवकाळी पाऊस, गारपीट यापासून बचाव व्हावा म्हणून वीस फूट (६ मिटर) उंचीच्या शेडनेटमध्ये केळीची लागवड केली असून त्यात ग्रॅन्डनैन व्हरायटी लावली आहे. १४-१५-१६ एप्रिल २०२३ रोजी म्हणजे उन्हाळ्यात क्रॉप गार्ड कव्हर (ताग) लावून केलेली बिगर हंगामी अशी ही लागवड आहे. गादीवाफा, दोन ठिबकच्या नळया आणि मल्चिंग असलेल्या या केळीला ४ महिने व २५ व्या दिवशी पहिला घड पडला. पावणे सहा महिन्यात सर्व झाडांना घड पडले. केळी पिकासाठी जैन कंपनीने फर्टिगेशनची जी शिफारस केलेली आहे. ती तंतोतंत पाळून बागेचे फ्रूट केअर मॅनेजमेन्ट करण्यात आले आहे. प्रत्येक झाडाला सरासरी ३० ते ३२ किलोचा घड पडला असून १५ जानेवारी पर्यंत सर्व केळी काढायला येतील. उघडया रानात ग्रॅन्डनैन बरोबरच नेंद्रन, पूवन, बंथल व रेडबनाना या जातीही लावल्या आहेत.



लाल व पांढ-या रंगाच्या कांद्याच्या १५ जाती ठिबक, गादीवाफा व मल्चिंगवर लावण्यात आल्या आहेत. लसुणच्याही १० जाती लावण्यात आल्या असून ठिबक व तुषार सिंचनाबरोबरच प्रवाही पद्धतीने पाणी देण्याचे मॉडेलही उभे करण्यात आले आहे. पपईच्या पाच जाती येथे लावण्यात आल्या असून त्यातल्या तीन जातींची रोपे जैन कंपनीने टिश्यूकल्चर पद्धतीने तयार केलेली आहेत. पपईत हळद व आले ही आंतरपिके घेण्यात आली असून हळदीच्या १९ जाती येथे लावण्यात आल्या आहेत. पॉलिमल्च करून गादीवाफ्यावर आधार देऊन व आधार न देता अशा दोन्ही पद्धतीने टोमॅटोची लागवड करण्यात आली आहे. त्यासाठी कागोमी नावाची जात वापरली आहे. हिरव्या मिरचीची देखील अशाच पध्दतीने लागवड केली आहे.

जैन स्वीट ऑरेंजच्या पाचही व्हरायटी गादीवाफा आणि ठिबकच्या दोन नळयांवरती पहायला मिळतील. याशिवाय टाकरखेडा येथे फ्यूचर फार्मिंग, रोपवाटिका, दर्जेदार व रोगमुक्त रोपे कशी बनतात ते पाहता येईल. परिश्रम समोर ठिबक सिंचनाचे प्रात्यक्षिक व अद्यावत साधन सामुग्री बघता येईल. याशिवाय अन्यही अनेक गोष्टी पाहून मनात जर काही प्रश्न व शंका उपस्थित झाल्या तर त्याही लगेच तिथल्या तिथे जैनच्या कृषी पीक तज्ज्ञांना विचारता येतील. नवीन ज्ञान व तंत्रज्ञानाचे गाठोडे हे प्रदर्शन पाहण्याने आपल्या हाती लागणार आहे. **चला तर मग लगबगीने जळगावच्या जैन हिल्सवर !**


बारामतीच्या कृषी विकास प्रतिष्ठानमध्ये आप्पासाहेब पवार बोलताना शेजारी कवी ना.धों. महानोर, भवरलाल जैन, सुरेशदादा जैन, मुरलीधर अण्णा पवार, ऑस्ट्रेलियन भगिनी आणि पाठीमागे दिलीप वळसे पाटील इ.

आहोत. हे सर्व पाणी ठिबक-तुषार संचाद्वारे वापरले तर कितीतरी अधिक जमीन आपण ओलिताखाली आणू शकू. त्यावेळी चर्चेत आमच्या लक्षात आले, आपल्या देशात पाण्याचे दारिद्र्य नाही, नियोजनाचे दारिद्र्य आहे.

ही उणीव भरून काढण्याचे काम देशात जर प्रथम कुणी केले असेल तर ते भवरलालजींनी केले. त्यांनी ठिबकचे तंत्रज्ञान व साहित्य परदेशातून प्रथम भारतात आणले. १९८५-८६ सालची ही गोष्ट असेल. त्यावेळी त्यांनी जे धाडस दाखविले तो मोठा चर्चेचा व कौतुकाचा पण तरीही शंकेचा मोठा विषय देशात बनला होता. ठिबकच्या थेंब थेंब पाण्यावर झाडे कशी तग धरतील? उन्हाळ्यात ती टिकतील का ? झाडांची मुळे खोलवर कशी जातील? झाडाला फळे लागतील का ? असे असंख्य प्रश्न व शंका लोकांच्या मनात होत्या. कुणाचा विश्वासच या तंत्रज्ञानावर बसत नव्हता. तेव्हा भाऊंनी अंधारात उडी मारण्याचे धाडस केले आणि ठिबक-तुषार सिंचनाचे साहित्य निर्माण करण्याचा व्यवसाय सुरु केला. परदेशातून तंत्रज्ञान आणून आपल्या वातावरणाला, हवामानाला योग्य ठरेल असे साहित्य बनविण्यास प्रारंभ केला. त्यासाठी आपल्या गरजांचा अभ्यास करून संशोधन केले. नवनवे प्रयोग व चाचण्या केल्या. पथदर्शी प्रकल्प आधी स्वतःच्या शेतावर उभे केले. ते शेतक-यांना दाखविले. माझे ज्येष्ठ बंधू आप्पासाहेब यांचीही भाऊंना मोठी साथ होती. आपासाहेबांनी देखील बारामतीच्या कृषी विकास प्रतिष्ठानमध्ये शेतीवर नवनवीन प्रयोग चालविले होते. १९८५च्या सुमारास अप्पासाहेबांनी गाडग्याला भोक पाडून त्यात सुतळी बसविली होती आणि गाडगे सिताफळाच्या झाडाखाली ठेवून तो पाण्याने भरत होते. सुतळीतून हळूहळू थेंब थेंब पाणी पाझरत. होते.त्यातून झाड जगते आहे हे सिध्दही झाले होते. विशेष म्हणजे अप्पासाहेब स्वत: पुण्याच्या कृषी महाविद्यालयातून कृषी पदवीधर झाले होते आणि फार पूर्वीच त्यांनी इस्राईलमध्ये काही महिने राहून शेतीचे शिक्षणही घेतले होते. आधुनिक शेती कमी पाण्यावर कशी पिकवितात ते पाहिलेही होते. त्यामुळे त्यांनी भवरलाल भाऊंनी उत्पादित केलेल्या व परदेशातून आणलेल्या ठिबक सिंचन तंत्रज्ञानाचा कृषी विकास प्रतिष्ठानच्या शेतीवर प्रारंभ सुरू केला. अगदी उसाला देखील ठिबक संच बसविला. महाराष्ट्र आणि देशातून असंख्य शेतकरी ठिबकवरची पिके पाहायला यायचे. आप्पासाहेब झाडाखाली उभे राहून तासनतास बोलायचे. शेतकरी तल्लीन होऊन ऐकायचे. नंतर तर मग आप्पासाहेबांनी गावोगावी जाऊन शेतक-यांसाठी ठिबक सिंचनावर भाषणे सुरू केली. त्यांची व आण्णासाहेब शिंदे यांची प्रचंड मैत्री होती. या

दोघांनी महाराष्ट्रभर हिंडून ठिबक सिंचनाचा प्रसार व प्रचार केला. एका बॅगेत ठिबक सिंचनासाठी लागणारे लॅटरल (नळ्या), ड्रीपर्स, फिल्टर हे सर्व साहित्य भरून ते सभेच्या ठिकाणी घेऊन जात. शेतकऱ्यांना विषय समजून सांगत. पुढे मी मुख्यमंत्री झाल्यानंतर या ठिबक सिंचनासाठी राज्य सरकारकडून अनुदान (सबसिडी) देण्याची योजना प्रथम जाहीर केली. महाराष्ट्र हे तेव्हां ठिबक सिंचनासाठी अनुदानाची योजना जाहीर करणारे देशातील पहिले राज्य होते. हळूहळू ठिबकवरची पीके पाहिल्यानंतर शेतक-यांचा या तंत्रज्ञानावर विश्वास बसू लागला आणि आज आपण असे पाहतो आहोत की, महाराष्ट्रात द्राक्ष, डाळिंब, केळी ही पिके पूर्णपणे ठिबक सिंचनाखाली जाऊन जवळपास १० टक्के शेती या आधुनिक तंत्राखाली गेली आहे. अर्थात माझे अजून पूर्ण समाधान झालेले नाही. ऊस उत्पादक शेतक-यांनी मात्र जेवढा या तंत्रज्ञानांचा स्वीकार करायला पाहिजे होता तेवढा अद्याप झालेला नाही. ही माझ्या मनातली खंत आहे. यासाठी आम्ही केंद्र व राज्य सरकारमधून तसेच वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, राज्य व राष्ट्रीय साखर संघ, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन व कृषी विद्यापीठे यांच्यामार्फत खूप प्रयत्न केले. अनेक पथदर्शी प्रकल्प उभारले पण ऊस उत्पादक शेतक-यांनी पाहिजे त्या प्रमाणात या ठिबक तंत्रज्ञानाचा स्वीकार केला नाही. तथापि तो भविष्यकाळात कधी तरी करावाच लागेल. कारण शेतीचे पाणी दिवसेंदिवस कमी कमी होत चालले आहे आणि ऊसाचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत चालले आहे. मात्र त्याला पूर्वी इतके प्रचंड पाणी देणे आगामी काळात शक्य होणार नाही असे चित्र आत्ताच दिसू लागले आहे. यावर्षी (२०२३) तर काही जिल्हयात पाऊस अत्यंत कमी झाल्यामुळे दुष्काळाची अवस्था निर्माण झाली आहे. अशा स्थितीत ऊस पीक कसे जगेल आणि साखर कारखाने कसे गळीत हंगाम पूर्ण करतील हा प्रश्नच आहे. त्यामुळे यापुढील काळात प्रकल्पांमधले व भूगर्भातले पाणीही सर्वांना जपूनच व काटकसरीने वापरावे लागणार आहे. या ठिबक-तुषार तंत्रज्ञानाचा प्रसार-प्रचार करण्याचे जे काम आप्पासाहेब, आण्णासाहेब आणि भवरलालजी या त्रिकूटाने केले त्यामुळे महाराष्ट्र शेतीत आणि विशेषतः फळबागांच्या क्षेत्रात देशात पहिल्या क्रमांकावर राहिला. या फळे निर्यातीतून देशाला मोठे परकीय चलन मिळाले. लोकांना मोठ्या प्रमाणावर बारमाही रोजगार मिळाला


*आवळ्याच्या झाडाचे ठिबक पाहताना व आवळ्याचा आस्वाद घेताना भाऊ*

आणि शेतक-यांची आर्थिक उन्नती होऊन त्यांचे राहणीमान सुधारले. भवरलाल भाऊंनी हे ठिबकचे तंत्रज्ञान देशात सर्वप्रथम आणून शेती क्षेत्रात मोठी क्रांती घडविली आहे. या महान कार्याबद्दल आपण सर्वांनी व देशानेही त्यांचे कायम ऋणी राहिले पाहिजे.

**फळ प्रक्रिया व केळी निर्यात**





*प्रक्रिया कारखान्यांमध्ये तयार होणाऱ्या पदार्थांची महती विषद करताना भाऊ*

शेतमाल हा नाशवंत आहे. तो जास्त काळ टिकत नाही आणि साठवणूकही करता येत नाही. विशेषतः फळे आणि भाजीपाला हा वर्षभर साठवून पुरवायचा असेल तर त्यावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी करणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन भवरलालजींनी केळी, आंबा, डाळिंब, सीताफळ, आवळा, पपई, पांढरा कांदा यांवर प्रक्रिया करणारी कारखानदारी जळगाव, चित्तूर व अन्य ठिकाणी उभी केली. हे प्रक्रिया कारखाने उभारणे मोठे जिकीरीचे व आव्हानात्मक काम होते. कारण प्रक्रियेसाठी लागणारा कच्चा माल व तो ही पाहिजे त्या जातीचा मिळणे आवश्यक होते. निर्यात आणि प्रक्रिया यासाठी वेगवेगळ्या जाती लागतात हे आपल्याला अगोदर माहितच नव्हते.

आपण फळे, भाजीपाला यांसारखा माल उत्पादित करीत होतो पण जगाच्या बाजारपेठेत कोणत्या वाणांना मागणी आहे. कोणत्या रंगाचा, रूपाचा, चवीचा, वासाचा, आकाराचा, दर्ज्याचा, टीएसएसचा माल पाहिजे याची फारशी माहिती नव्हती, अभ्यास नव्हता. भवरलालजींनी अगोदर हा अभ्यास केला. नंतर त्या जातींचे बियाणे, रोपे, कलमे आणून येथे त्यांचे बंदिस्त व नियंत्रित वातावरणात मातृवृक्ष तयार केले. त्या मातृवृक्षापासून टिश्यूकल्चर पद्धतीने केळी मोसंबी, सीताफळ, डाळिंब यांची दर्जेदार, रोगमुक्त व व्हायरस फ्री रोपे तयार केली. पहिली शास्त्रशुद्ध व रोगमुक्त रोपवाटिका त्यांनी उभी केली त्यातून ग्रॅन्ड नैन जातीच्या केळीची निर्यात सुरु झाली. शेकडो वर्षापासून जळगावात केळी पिकत होती. पण त्या केळींनी जगाची बाजारपेठ कधी पाहिली नव्हती. ही केळी निर्यात झाली पाहिजे हे भाऊंचे स्वप्न होते. ते त्यासाठी अविरत धडपड करीत होते. या कामासाठी ते अनेकदा माझ्याकडे आले. केळीवर आलेल्या रोगाचे नियंत्रण

# संरक्षित घराचे मॉडेल बनविले भूकंपग्रस्तांसाठी

## भाऊंच्या सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय

सामाजिक बांधिलकी आणि मानवतावादी दृष्टीकोन ही भवरलालजींची आणखीन दोन मोठी वैशिष्ट्ये होती. याचे पुन्हा एकदा प्रत्यंतर १९९३ साली किल्लारी येथे झालेल्या भूकंपाच्या वेळी निदर्शनास आले. भूकंपग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन करण्यासाठी मी सोलापूरला १५ दिवस ठाण मांडून बसलो होतो. एके दिवशी भवरलाल भाऊ त्यांच्या सहकाऱ्यांसह एका उभ्या केलेल्या घराचे मोठे आख्खे मॉडेलच घेऊन माझ्याकडे सोलापूरला





*किल्लारीतील भूकंपग्रस्तांसाठी जैन इरिगेशनने बनविलेले घराचे मॉडेल सोलापूरला नेऊन शरद पवार यांना दाखविताना भवरलाल जैन, शिवाजीराव देशमुख आदी*

आले. भूकंपग्रस्तांसाठी मी काही घरे बांधून देतो. वेळ कमी असल्यामुळे प्लॅस्टीक शीट्सचे हे घर बनविले आहे. ते त्वरीत उभारता येईल आणि एका जागेहून दुसरीकडे हलवून नेताही येईल असे ते म्हणाले. घराचे मॉडेल फार सुंदर होते आणि मुख्य म्हणजे टिकावू होते, वजनाने हलके होते आणि यदाकदाचित पुन्हा भूकंप आला तर घराला आणि माणसांना दोघांनाही क्षिती पोहोचणार नाही अशा प्रकारचे होते. इतर अनेक बांधकाम व्यावसायिकांनी देखील नवीन जागी घरे बांधून देण्याचे प्रस्ताव दिले होते. भवरलालजींनी घराचे मॉडेल तयार करण्यासाठी जी पीव्हीसी शीटस व इतर साहित्य वापरले होते ते अत्यंत उत्कृष्ट दर्ज्याचे, सुधारित तंत्रज्ञानाचे व चिरकाल टिकणारे होते. पण किमतीच्या दृष्टीने ते महाग पडत होते. म्हणून आम्ही त्यावेळी त्या मॉडेलचा विचार केला नाही. पण नंतर गुजरात भूकंपाच्या वेळी जेव्हा पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी पुनर्वसनाची जबाबदारी माझ्यावर सोपविली तेव्हां भाऊंकडून या साहित्याचा वापर करून तयार केलेल्या चार शाळा आम्ही भुजसाठी बनवून घेतल्या.

संकटसमयी लोकांच्या मदतीला धावून जाण्याची वृत्ती भाऊंच्या अंतःकरणात होती ती त्यांनी शेवटपर्यंत जपली.

करण्यासाठीही मी एकदा खूप मोठे पॅकेज दिले होते व स्वत: जळगाव जिल्हयात जाऊन रोगग्रस्त केळी बागा पाहिल्या होत्या. भाऊंना घेऊन त्यावेळेला आम्ही केंद्रीय कृषी मंत्री, व्यापारमंत्री, अर्थमंत्री यांना भेटलो होतो. भुसावळ, यावल, रावेर येथून केळी घेऊन जाण्यासाठी रेल्वेने वॅगन उपलब्ध करून द्याव्यात, भुसावळला ड्रायपोर्ट तयार व्हावा व तेथून केळी व अन्य मालाचे कंटेनर मुंबई बंदरात जावेत यासाठी भाऊंनी सतत माझ्यामागे तगादा लावला व प्रयत्नही केले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रेल्वे वॅगन्स व डबे उपलब्धही झाले.

फळ प्रक्रिया ही उत्पादित होणान्या शेतमालावर जेमतेम १ टक्का होते. बाकी सर्वमाल ताजी फळे म्हणूनच विकावा लागतो. त्यामुळे बाजारात एकदम खूप मोठ्या प्रमाणांत माल आला तर भाव पडतो आणि शेतक-याचे नुकसान होते. यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी करणे आवश्यक होते. ती गरज ओळखून ३०-३५ वर्षांपूर्वी भाऊंनी ही कारखानदारी उभी करून शेतक-यांना मोठा आधार दिला.



जगामध्ये पांढ-या रंगाच्या कांद्याला मोठी मागणी आहे. प्रक्रियेसाठी पांढराच कांदा वापरावा लागतो. कारण यात टीएसएसचे (एकूण साररूप घन भाग) प्रमाण अधिक राहून पाण्याचे प्रमाण कमी असते. त्यामानाने लाल रंगाच्या कांद्यात पाण्याचे प्रमाण अधिक राहून टीएसएसचे प्रमाण कमी राहते. लाल रंगाचा प्रक्रिया केलेला कांदा काही काळानंतर काळा पडण्याची शक्यता असते व त्याला ग्राहकांकडून फारशी मागणीही नसते. त्यामुळे पांढ-या कांद्यावरच प्रक्रिया करावी लागते. पण आपल्या राज्यात तर बहुतांश शेतकरी लाल रंगाचाच कांदा पिकवितात. भाऊंनी शेतक-यांशी करार करून त्यांना पांढ-या कांद्याचे बियाणे दिले आणि त्यांनी उत्पादित केलेल्या कांद्यावर प्रक्रिया करून तो माल जगाच्या बाजारपेठेत पाठविला. या पांढ-या कांद्याने भाऊंना धंद्यात मोठ्या अडचणीत आणले होते. सुरुवातीला खूप मोठा तोटा झाला होता. आंतरराष्ट्रीय स्पर्धक जैन उद्योग समुहाला बाजारपेठेत शिरू देत नव्हते. पण भाऊंनी चिकाटीने व चिवटपणे तोटा सोसून त्यांच्याशी जीवघेणी स्पर्धा



पांढऱ्या कांद्यापासून बनविणारे वेगवेगळ्या आकाराचे फ्लेक्स



पाचोऱ्याचे विश्वासराव पाटील यांना डॉ. आप्पासाहेब पवार सुक्ष्मसिंचन पुरस्कार प्रदान करताना शरद पवार, भवरलाल जैन, सुरेशदादा जैन, बाळासाहेब थोरात आणि कवी ना.धों.महानोर

केली आणि गुणवत्तेच्या जोरावर शेवटी त्यांनी ही बाजारपेठ काबीजही केली.

भवरलालजींचा एक मोठा उल्लेखनीय व उद्योजकांनी आवर्जून स्वीकारावा असा गुण म्हणजे अवास्तव नफ्याच्या पाठीमागे ते कधी लागले नाहीत आणि त्यासाठी गुणवत्ता, दर्जा यात कधी तडजोड केली नाही. त्यामुळे जैन कंपनीचा माल उदा. पाईप, ठिबकच्या नळ्या, ड्रीपर, टिश्यूकल्चर केळीची व डाळिंबाची रोपे, वेगवेगळ्या प्रकार चे फिल्टर्स, व्हॉल्व वगैरे. हा थोडा महाग वाटला तरी दर्जेदार असल्यामुळे अनेक वर्षे टिकतो यांचा अनुभव मी स्वतः माझ्या गोविंद बागेतील शेतात घेत आहे. जैनची ग्रॅन्ड नैन केळी, ब्राझीलहून त्यांनी आणून विकसीत केलेली जैन स्वीट ऑरेंज (मोसंबी), डाळिंब या सर्वांची लागवड करून मी चांगले उत्पादन घेतले आहे.

### आप्पासाहेबांच्या नावाने पुरस्कार

माझे जेष्ठ बंधू आप्पासाहेब पवार यांचे २००० सालामध्ये निधन झाले. भाऊ आणि आप्पासाहेब यांची अगदी जीवश्च कंठच्च मैत्री असल्यामुळे त्यांच्या निधनानंतर भाऊंनी आप्पासाहेबांच्या नावाने सूक्ष्मसिंचनाच्या क्षेत्रात कार्य करणा-या एका उत्कृष्ट शेतक-याला दर दोन वर्षातून एकदा दोन लाख रुपयांचा पुरस्कार सुरू केला. या प्रत्येक पुरस्कार वितरण समारंभाला मी हजर राहीलो आहे. पवार कुटूंबाशी जैन कुटूंबाचे जे नाते जोडले गेले आहे ते घरच्यासारखे आहे. ही दोन्ही कुटूंबे एकच आहेत असे आम्ही सारेजण मानत आलो आहोत. भाऊंच्या अशोक, अनिल, अजित आणि अतुल या चार मुलांनी देखील आमच्या कुटुंबाशी पारिवारीक नाते सांभाळले आहे. हे नाते निर्माण करणारा मुख्य खांब म्हणजे मोठेभाऊ आणि ज्यांच्यामुळे एवढी जवळीक झाली, आपुलकी वाढली ते आप्पासाहेब, हे दोघेही आज हयात नाहीत. मला अनेकदा प्रश्न असा पडतो की, दोघेही आज जिवंत असते तर त्यांनी एकमेकांची थट्टा मस्करी करून किती खेचली असती पण महाराष्ट्र पुढे नेला असता. ही दोन्ही माणसे शेती आणि शेतकऱ्यांवर अंत:करणापासून प्रेम करणारी व त्यांच्या उन्नतीकरिता अहोरात्र व अखंडपणे निरपेक्षरित्या धडपडणारी होती. या दोघांच्याही निधनामुळे महाराष्ट्राचे आणि देशाचे मोठे नुकसान झाले आहे. मनापासून सांगतो मैत्रीची ही पोकळी आता कधीच व कशानेही भरणार नाही!

**शब्दांकन - डॉ. सुधीर भोंगळे**



# भाऊंची जैनहिल्सची निर्मिती पाणलोट विकासाचे परिपूर्ण मॉडेल

**नितीन गडकरी**
केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री, भारत सरकार, नवी दिल्ली

जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन यांनी महाराष्ट्राच्या शेतीमध्ये काम करायला सुरुवात केली याला आता जवळपास ६० वर्षे झाली आहेत. मागील ६० वर्षात महाराष्ट्रात आणि देशात शेतीच्या क्षेत्रासाठी त्यांनी जेवढे काम केले आहे तितके कुणी केले असेल असे वाटत नाही आणि दिसतही नाही. महाराष्ट्रातल्या जवळपास निम्म्या जमिनी या खडकाळ, मुरमाड, दगडी, माळरानाच्या, ओसाड व पडीक पडलेल्या आणि कुसळी गवतही देखील उगवणार नाही अशा निकृष्ट प्रतीच्या आहेत. या जमिनी शेती व पिकांच्या लागवडीखाली आणणे, उपजावू करणे आणि त्याच्यावर निर्यात होऊ शकणा-या अळिंब, द्राक्ष, आंबा, ड्रॅगन फ्रुट यांसारख्या फळपिकांचे उत्पादन घेणे ही काही तितकीशी सहज सोपी अशी गोष्ट नाही. त्यात दुष्काळात तेरावा महिना म्हणजे पाऊस अपुरा व अनियमीत असल्यामुळे आणि चार महिन्यांच्या मोसमी पावसावरच आपली संपूर्ण मदार अवलंबून असल्यामुळे शेतीसाठी मुबलक पाणी

उपलब्ध नाही. त्यामुळे धरणे, बंधारे, विहिरी, बोअरवेल्स, कूपनलिका, तलाव यात साठविलेले, अडविलेले, मुरविलेले पाणी जपून काटकसरीने वापरण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. काटकसरीने जपून पाणी वापरण्याचा ठिबक सिंचन हा पहिला एकमेव राजमार्ग आहे. या राजमार्गाचे सगळे तंत्रज्ञान भारतात आणि महाराष्ट्रात सर्वप्रथम जैन इरिगेशन कंपनीचे अध्यक्ष भवरलाल जैन यांनीच आणले. इतकेच नव्हे तर आपल्या हवामान व परिस्थितीला अनुरूप होईल अशा पद्धतीने ठिबक- तुषार सिंचन साहित्याची निर्मिती त्यांनी देशातच करून आपल्या जमिनींची प्रत, गुणवत्ता लक्षात घेऊन त्याप्रमाणे सिंचनाचे आराखडे शेतावर तयार केले. त्यामुळे पडीक, माळरानावरच्या जमिनींचा भावही २०-२५ लाख रूपये एकरच्या पुढे गेला असल्याचे चित्र आज आपण पाहतो आहोत. ही सगळी किमया ठिबक सिंचन तंत्रज्ञानाची, ऊती संवर्धन पद्धतीने बनविलेल्या रोपांची आणि फर्टिगेशन म्हणजे ठिबक संचामधून दिल्या जाणा-या द्रवरूप खतांची आहे. ही तीनही तंत्रज्ञाने प्रथम जैन इरिगेशन कंपनीनेच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी पुरविली. या सर्व क्षेत्रात जैन कंपनीने मूलभूत आणि पायाभूत स्वरूपाचे काम केले म्हणून माळरान व पडीक मुरमाड जमिनींवर मोठ्या ऐटीत व दिमाखदारपणे फळबागा उभ्या राहू शकल्या आणि फलोद्यानाच्या क्षेत्रात क्रांती होऊन भारत देश फळांच्या उत्पादनात प्रथम क्रमांकावर पोहचू शकला. भवरलालजींच्या दूरदृष्टीला व प्रचंड मेहनतीला आलेले हे यशस्वी फळ आहे असे मी मानतो. आणि म्हणूनच मला त्यांच्याबद्दल प्रचंड आदर आहे, मानसन्मान आहे.

### दर्जेदार रोपेकलमांची निर्मिती

आपल्या देशात लाखो रोपवाटिका आहेत. बहुतेक सर्वजण शेतक-यांना रोपे-कलमे विकून पैसे मिळविण्याच्या नादात आहेत. फार थोडे नर्सरीवाले शेती आणि शेतक-यांशी बांधिलकी मानून सेवाभावी वृत्तीने दर्जेदार व रोगमुक्त आणि व्हायरस फ्री अशी रोपे बनवित आहेत. कृषी विद्यापीठे, केंद्र सरकारच्या संशोधन संस्था आणि राज्य सरकारच्या रोपवाटिका यांच्याकडूनही शेतक-यांची दर्जेदार रोपांची गरज पूर्ण होत नाही असे बऱ्याचदा आपल्या निदर्शनास येते. बागा दीर्घकाळ टिकून सुदृढ राहायच्या असतील तर खुंट (रूटस्टॉक) चांगले शोधून, विकसीत करून त्यावर



*जैन इरिगेशनने बनविलेली टिश्यूकल्चरची रोपे पाहून जैन स्वीट ऑरेंजची चव घेताना नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस आणि मान्यवर*

रोपे (सायन) बांधली पाहिजेत. पण मुळात खुटांवर फारसे चांगले संशोधन आपल्याकडे झालेले आढळत नाही. या पार्श्वभूमीवर भवरलाल जैन यांनी उत्कृष्ट रोपे-कलमांच्या निर्मितीसाठी ठळकपणे केलेले काम अधोरेखीत केले पाहिजे. त्यांनी दर्जेदार रोपांच्या निर्मितीसाठी कोट्यावधी रुपये खर्च करून अद्ययावत अशा टिश्युकल्चर लॅब उभ्या केल्या. जळगांवात जगातले अद्ययावत तंत्रज्ञान आणून बायोटेक्नॉलॉजीची लॅब उभी केली. प्रयोगशाळेत तयार केलेली केळी, डाळिंब, मोसंबी, स्ट्रॉबेरी, टोमॅटो, वांगे,हिरवी मिरची यांसारखी भाजीपाल्याची रोपे दोनदा हार्डनिंग करण्यासाठी तीनशे एकर क्षेत्रावर अद्ययावत अशी बंदिस्त व नियंत्रित वातावरणातील ग्रीनहाउसेस उभी केली. त्यात रोपे लागवडीयोग्य झाल्यानंतरच शेतक-यांना दिली जातात. हे सगळे काम जिकीरीने, चिकाटीने व गुणवत्ता सांभाळून करावे लागते. ही रोपे-कलमे तयार करण्यासाठी वापरला जाणारा मिडीया (माध्यम ) आणि रूट कटर ट्रे, कुंड्या हा सगळा माल उत्तम गुणवत्तेचाच वापरला जातो. ही जी उत्कृष्टतेची आस भाऊंना लागलेली होती त्यामुळेच त्यांच्या रोपा कलमांचे जगात नाव झाले आणि पहिल्या क्रमांकाची रोपे असल्यामुळे शेतक-यांची रोपांची मागणीसाठी झुंबड उडते. दरवर्षी केळीची ग्रॅन्डनैन जातीची जवळपास १० ते १२ कोटी रोपे जैन कंपनी विकते पण रोपे ऐनवेळी मिळत नाहीत. त्यासाठी सहा महिने आधी पैसे भरून बुकिंग करावे लागते. गुणवत्ता असली तर काय घडू शकते याचे हे नामी उदाहरण आहे. ही मोठ्या भाऊंनी व्यवसायाची बसविलेली घडी आहे आणि तिला शेतक-यांच्या सेवेचा वसा आणि वारसा आहे.

### अतिसघन पद्धतीने बागांची उभारणी

भवरलालजींनी ब्राझीलमधून मोसंबीच्या भरपूर रस असलेल्या व्हॅलेंन्शिया, नेव्हल, नटाल, पेरा, वेस्टीन, हॅम्लिन यांसारख्या जाती आणून त्यांचे मातृवृक्ष जळगांवच्या ग्रीनहाऊसमध्ये वाढविले. त्या झाडांवरील डोळे काढून त्यांनी टिश्यूकल्चर पद्धतीने जी रोपे तयार केली आहेत ती ‘जैन स्वीट ऑरेंज’ या नावाने शेतकऱ्यांना बुकिंग करूनच लागवडीसाठी दिली जातात. या मोसंबी-संत्र्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प जैन कंपनी अमरावती जवळच्या मोर्शी येथे उभा करीत आहे. शेतक-यांची आर्थिक उन्नती झाली पाहिजे आणि त्याने उत्पादित केलेल्या मालाला रास्त किंमत मिळाली पाहिजे अशा विचाराने भारलेल्या भाऊंनी त्यादृष्टीने करार शेतीचे मॉडेल ३० वर्षांपूर्वी पांढ-या कांद्यामध्ये विकसीत केले आणि आता ते मॉडेल मसाल्याचे पदार्थ



*जैन हिल्सवर डबल लॅटरल टाकून गादीवाफ्यावर अतिसघन पद्धतीने केलेली आंबा लागवड*

# ...तेव्हा मला खरे भाऊ व उद्योगसमूह कळला!



भवरलालजींच्या कामाबद्दल आणि त्यांनी उभ्या केलेल्या प्रक्रिया कारखानदारीबद्दल खूप वर्षांपासून नुसते ऐकून होतो. त्यामुळे ते काम बघण्याची व भाऊंना प्रत्यक्ष भेटून बोलण्याचीही खूप इच्छा होती. सौर उर्जा प्रकल्पाच्या निमित्ताने ती पूर्ण झाली. भाऊंचे वागणे, बोलणे अतिशय लाघवी आणि नम्र होते. प्रत्येक गोष्टीचा त्यांनी बारकाईन अभ्यास केला आहे हे त्यांच्या बोलण्यातून जाणवत होते. त्यांचा प्रत्येक शब्द कोंदणात बसवावा असा होता. त्यांच्या स्पष्ट व ठाम बोलण्याला चिंतनाची डूब होती. उद्योजक म्हणून भाऊ खूप मोठे होते पण त्यांचे पाय जमिनीवरच्या मातीलाच लागलेले होते. त्यामुळे प्रत्येकाला ते आपल्या जवळचेच आहेत असे वाटत असे. सहकाऱ्यांशी गोड बोलून व प्रेमाने विषय समजून सांगत. आपल्याला पाहिजे तसे काम करून घेण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. एका वेळी अनेक कामे करणे हे त्यांचे कसब होते. शेती आणि शेतकऱ्यांवर त्यांचे विलक्षण प्रेम असल्यामुळेच त्यांनी आयुष्यभराच्या कामासाठी हा व्यवसाय निवडला. एका अर्थाने आमच्या दोघांचीही आवड एकच राहिली. त्यामुळेच भाऊंच्याबद्दल माझ्या मनात प्रचंड आदर आणि प्रेम आहे व ते प्रत्यक्ष भेटीत व बोलल्यानंतर अधिक वृद्धींगत झाले. तेव्हा मला खरे भाऊ व जैन उद्योगसमूह कळला.

(उदा. हिरवी व लाल मिरची, हळद, आले, धने, जिरे, काळी मिरी इत्यादी) यातही वापरले जात आहे. टिश्युकल्चर तंत्राद्वारे आंब्याचे रोप तयार करणे जगात अजून कुणालाही जमलेले नाही. ते काम जैन इरिगेशन कंपनीने यशस्वी करून दाखविले. टिश्यूकल्चर पद्धती वापरून आंब्याचे रोप तयार करण्यासाठी भवरलालजी सतत १५ वर्षे प्रयत्नशील होते. खालचा खुंट (रूटस्टॉक) आणि वरचे रोप (सायन) हे काही केल्या एकमेकांशी जुळत (मॅच) नव्हते. पण भाऊंनी हार मानली नाही. ते सतत प्रयत्नशील राहिले आणि अखेर यश मिळालेच. आज जळगावच्या जैन हिल्सवर टिश्यूकल्चर आंब्याची झाडं दिमाखाने उभी आहेत आणि त्यांना दरवर्षी आंबे लागताहेत हे भवरलालजींच्या साधनेचे, कष्टाचे व दूरदृष्टीचे फळ आहे. आता तर मी असे ऐकले आहे की, एकाच जातीच्या झाडाला दोन चार प्रकारचे आंबे लागतील अशा पद्धतीची रोपे-कलमे कंपनी तयार करते आहे. लवकरच ती शेतक-यांना देण्यात येणार आहेत. असे झाले तर आणखीन एक मोठी क्रांती आंब्यांच्या क्षेत्रात घडून येईल. आंब्याची एकरी एक हजार ते बाराशे रोपे लावून अति सघन पद्धतीने आंबा बाग उभी करण्याचे तंत्रज्ञान भाऊंनी प्रथम विकसीत करून त्याचे मॉडेल जैन हिल्सवर उभे केले. आपली विद्यापीठे १०×१० मिटरवर एकरी ४४ आंब्याची झाडे लावण्याची जेव्हा शिफारस करीत होती तेव्हा भवरलालजी एकरी हजार झाडे लावायला सांगत होते. याला म्हणतात दूरदृष्टी. आंब्यावर प्रक्रिया करण्यात जैन कंपनीचा जगात पहिला क्रमांक आहे. दरवर्षी एक ते दीड लाख टन आंब्यावर ते प्रक्रिया करून जगभर माल विकतात. शेतकऱ्यांकडून

रास्त दराने आंबा खरेदी करतात. त्यामुळे आंब्याचे लागण क्षेत्र आता दिवसेंदिवस वाढते आहे हे आपण पाहतो आहोत.

### जलसंधारणाचे उत्कृष्ट मॉडेल

आपण सगळेजण पाण्याचा तुटवडा आहे, ते कमी उपलब्ध आहे म्हणून नुसत्या आरोळ्या ठोकतो, बोंबा मारतो पण प्रत्यक्ष पाणी नियोजन करण्याच्या कामात कमी पडतो आणि त्याबद्दल कुणी काही बोलत नाही. मी जळगावला दोन-तीन वेळा विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने जाऊन भवरलालजींना भेटलो आहे आणि त्यांनी अत्यंत शास्त्रीय पद्धतीने म्हणजे माथा ते पायथा या तत्वावर एका वेळी सर्व कामे हाती घेऊन व पूर्ण करून जैन हिल्सचा जो पाणलोट विकसीत केला तो पाहिला आहे. या दोन हजार एकराच्या पाणलोटामध्ये १९९३ साली भाऊंनी जेव्हा जमीन खरेदी केली तेव्हा पाण्याचा एक थेंबही नव्हता. कुसळी गवतही उगवत नव्हते. भूजल विकास यंत्रणेतल्या अधिका-यांनी सांगितले इथे पाणी लागणार नाही. सगळीकडे दगड, खडक, मुरूम आहे. त्यात पाणी जिरणार नाही. भाऊंनी अहोरात्र

## पाणलोट यशस्वीतेसाठी पीक पध्दतीची शिस्त

जळगावातील जैन हिल्सचा पाणलोट नुसता शास्त्रीय दृष्ट्या विकसीत करून भाऊ थांबले नाहीत. हा पाणलोट चिरंतन टिकवायचा असेल आणि त्यात जमा झालेले पाणी न्याय्य पद्धतीने व काटकसरीने वापरायचे असेल तर ठिबक व तुषार सिंचनाचा वापर तर अनिवार्यच आहे. पण त्याचबरोबर पीक पध्दतीची शिस्त पाळणेही आवश्यक आहे. भाऊंनी जैन हिल्सवर सर्व पिके ठिबक सिंचनावर घेतली. अगदी खरीपातले भाताचे पीक सुद्धा ठिबकवर घेऊन शेतकऱ्यांसाठी ते मॉडेल म्हणून उभे केले. आता तर ऊस, केळी, कापूस, आंबा, मोसंबी, सीताफळ, पपई, जांभूळ यांसारख्या सर्व बागा ठिबक तंत्रावर उभ्या करून पाण्याचा मोजून व बारकाईने वापर चालू आहे. पाणलोट विकसीत केल्यानंतर निर्माण झालेले पाणी हे राष्ट्राच्या व समाजाच्या मालकीचे आहे याची जाणीव भाऊंनी अखेरपर्यंत ठेवली हे विशेष!

कहाणी कष्टलाटांच्या पाणलोटांची


आकाशातून दिसणारे जैन हिल्सचे विहंगम दृश्य

मेहनत केली. दगड, खडक फोडला. गवत, झाडेझुडपे लावली. पावसाचे पाणी हळूहळू जिरू लागले. सीसीटी, कंटूरबडींग, टेरेसिंग, लूज बोल्डर, स्ट्रक्चर, वनीकरण, चर, साठवण तलाव, बंधारे यांचे जाळे उभे केले. हजारो सौर पॅनेल्स लावली. स्वतःची संपूर्ण गरज भागेल इतकी सौर उर्जा (२४ मेगॅवॅट) निर्माण केली. बायोएनर्जी बनविली. आज जैन हिल्स हे जलसंधारण व पाणलोट क्षेत्र विकासाचे एक परिपूर्ण व उत्कृष्ट मॉडेल बनले आहे. ते पाहण्यासाठी देशभरातून लोक येतात. विकसीत केलेल्या पाणलोटातले पाणी ठिबक संचाद्वारे काटकसरीने कसे वापरावे याचे प्रात्यक्षिकही या जैन हिल्सवर आपल्याला पाहायला मिळते. जिथे कच्च्या मालाचे उत्पादन होते तिथेच त्यावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी करणे आणि स्थानिक मनुष्य रोजगारासाठी तिथेच सामावून घेणे हे आपल्या पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाचे मुख्य ध्येय व उद्दिष्ट होते. त्याची पूर्ती जैन हिल्सवर झाल्याचे चित्र आपल्याला पाहायला मिळते. इतरत्र कुठेही असे परिपूर्ण मॉडेल दिसत नाही.

### शालिन व नम्र व्यक्तिमत्व

एक प्रयोगशील, लोकाभिमुख, नम्र, शालिन व तळमळीने काम करणारी व्यक्ती अशी भवरलालजींची प्रतिमा त्यांच्या भेटी नंतर माझ्या मनामध्ये तयार झाली आहे. एका प्रश्नाचे कोडे मला पडले आहे आणि त्याचे उत्तर मात्र मला कोणीच देत नाही. ते कोडे म्हणजे एका जन्मात इतके प्रचंड काम एक व्यक्ती कशी करू शकते ? त्यांनी प्लॅस्टिकचा वापर करून पीव्हीसी, एचडीपीई, सबमर्सिबल, क्षारपड जमिनींच्या सुधारणेसाठी लागणारे सच्छिद्र पाईप, बोअरवेलमध्ये घालण्याकरिता उपयोगी पडणारे केसिंग पाईप, समुद्रातून इंधन तेल वाहून नेणारे कितीतरी असंख्य प्रकारचे व मोठ-मोठ्या क्षमतेचे पाईप बनवून जगभर पुरविले, पीव्हीसी शीटस विविध रंगात बनविल्या. प्लंबिंगचे साहित्य बनविले. तंत्रज्ञान स्वीकारून वापरण्यात केवळ स्वतः यशस्वी होऊन उपयोगी नाही. सर्व शेतक-यांनी आधुनिक नवे तंत्रज्ञान स्वीकारून वापरले पाहिजे यासाठी त्यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. हे ओळखून जैन हिल्सवर शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणाचे वर्ग आयोजित केले. हजारो शेतकऱ्यांच्या मोफत निवास व भोजनाची व्यवस्था करून त्यांना नवे शेतीशास्त्र शिकविले. देशभर कृषी मेळावे, चर्चासत्रे व परिसंवाद



गप्पांमध्ये रमलेले नितीन गडकरी आणि भवरलाल जैन

आयोजित करून ज्ञान व अनुभवाची घुसळण करण्याचा, देवाण-घेवाण करण्याचा प्रयत्न केला. ठिबक सिंचनाच्या विशेषत ऊसाला ठिबक संच शेतकऱ्यांनी बसवावा म्हणून हजारो मेळावे आपल्या राज्यात जैन इरिगेशनने मागील ३०-३५ वर्षात घेतले. पण आपला ऊस उत्पादक शेतकरी फार काही सुधारला नाही. आता संजीव माने, सुरेश कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली जे शेतकरी ऊस पिक घेताहेत ते नवीन तंत्रांचा व ठिबकचा वापर करताहेत. आमच्या पूर्ती गृपच्या साखर कारखान्यांमध्येही काही शेतकऱ्यांनी ठिबक, फर्टिगेशन याचा वापर सुरू केला आहे. माझ्या पत्नीनेही जैन ठिबकचे सगळे तंत्रज्ञान वापरून एकरी ८० ते १०० टन उत्पादन काढले आहे. ही सर्व प्रगती मोठ्या भाऊंच्या दूरदृष्टीची देण आहे असे मी मानतो. ज्या दिवशी राज्यातले सर्व ऊसाचे क्षेत्र पूर्णपणे ठिबक सिंचनाखाली जाईल त्या दिवशी भवरलीलजींचे स्वप्न पूर्णत्वाले गेले असेच मी मानेन. त्यासाठी आपण सर्वांनी कंबर कसून प्रयत्न करणे गरजेचे आहे. समाज आणि शासन लगेच बदलायला तयार नाही. शासन तर पाण्यात बसलेल्या म्हशीसारखे आहे. त्याला हाणून हाणून उठवावे लागते. ते हाणण्याचे काम नवी दृष्टी प्राप्त झालेल्या व आधुनिक तंत्रज्ञान स्वत: कृतीत उतरवून दाखविलेल्या प्रगतशील शेतकऱ्यांनी केले पाहिजे. तिच खरी भवरलालजींना जयंतीची भेट ठरेल! शुभंभवतू!





वाढत्या वयात नव्याने मैत्रीचे संबंध निर्माण होत नाहीत असा सर्वसाधारण समज आहे. पण याला अपवाद म्हणून जे काही सुखद संबंध आठवणीत राहतात त्यात भवरलाल जैन (मोठे भाऊ) यांच्याशी हळूवारपणे वाढत गेलेली मैत्री. त्यांच्या बरोबर अनेक वेळेला झालेल्या गप्पा हा एक सुखद आठवणींचा मोठा ठेवा आहे. गप्पाच नव्हे तर त्यांच्या बरोबर राहणे, त्यांच्या कुटुंबियांसमवेत घरात राहणे, मुले व नातवंडांशी गप्पा होणे या सर्व गोष्टीमध्ये त्यांच्यातील मैत्री स्थापन करण्याची व वाढवित नेण्याची कला ही अजूनही कायम लक्षात राहिली आहे. सहसा कोणाला दुखवायचे नाही, वाईट तर कोणाबद्दल फारसे बोलायचेच नाही आणि भविष्याबाबत नेहमी विधायक व सकारात्मक विचार करायचा हा त्यांच्या विचारांचा गाभा होता. दूरदृष्टी होती. आणि मुख्य म्हणजे त्याच्या मागे त्यांचा सतत चालणारा वाचनाचा व्यासंग आणि गाढा अभ्यास हा महत्वाचा आधारभूत पाया होता. त्यामुळे कधी कोणाला व काही वेळेला ते त्यांच्या मतप्रदर्शनाबाबत फार आग्रही आहेत असा चुकीचा ग्रह होण्याचा धोकाही होता. पण असे धोके सांभाळून त्यांनी आपल्या विचार व मतांमधील स्पष्टता कायम टिकविली



# भाऊंचे मनोरथ हायटेक शेतीचे !

**डॉ. माधवराव चितळे**
माजी जलसंपदा सचिव, भारत सरकार व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जलतज्ञ



*डॉ. माधवराव चितळे आणि भवरलाल जैन*

होती. आज आपल्याला ठिबक सिंचन ही ग्रामीण जीवनात, शेती व्यवस्थेत इतकेच नव्हे तर नागरी वृक्ष संगोपनातही सहजपणे स्वीकारली गेलेली आणि रूढ झालेली पाणी देण्याची पद्धत दिसून येते. पण ठिबक सिंचन ४० वर्षांपूर्वी जेव्हा समाजाला आजच्यासारखे दृढ परिचीत नव्हते तेव्हा त्याबाबत अनेक शंका-कुशंका उपस्थित होत होत्या. अशा वेळी त्या सर्व शंका व प्रश्नांना मनमोकळ्या चर्चा, निवेदने व प्रात्यक्षिके दाखवून त्या माध्यमातून प्रभावीपणे उत्तरे देऊन भवरलालजींनी देशातील सर्व शेतक-यांमध्ये अनुकूल वातावरण निर्मिती यशस्वीपणे केली. त्यात कधीमधी काहीशी आक्रमकताही डोकावल्यासारखी त्यावेळी वाटत असे, पण तो केवळ त्यांचा आग्रहीपणा नव्हता तर नव्याने उदयास येत असलेल्या आधुनिक शेती व्यवस्थेबद्दलचा जिव्हाळा आणि आत्मियता त्यातून व्यक्त होत असे. सिंचनाचे हे आधुनिक तंत्रज्ञान प्रत्येक शेतक-यापर्यंत पोहोचावे हे त्यांचे मनोरथ होते. त्यासाठी अव्याहत धडपड चालू होती. मनोरथाच्या मार्गावरून चालून ते पूर्णत्वाला नेण्यासाठी मनाला मनाने फुलवावे लागते. अभ्यासाने आळवावे लागते. आचरण अनंतत्वात ठेवावे लागते. म्हणजे अद्वातद्वा मनोरथ

निर्माण होत नाही. आसुरी आकांक्षा वाढत नाही. मनातून मने जपली जातात. या सर्व मनांची बेरीज म्हणजे उदात्तीकरण. तंत्रज्ञान आणि माहितीजालांचा मारा करण्यापेक्षा मनाला सुदृढ नि सुसंस्कृत करा हे भवरलालजींनी अचूक ओळखून मगच नव्या शतकाची दीपमाळ हातात घेतली होती. ही दीपमाळ त्यांनी प्रज्वलित केल्यामुळेच भारतीय शेतीला आणि शेतक-यांना नव-नव्या प्रकाशवाटा दिसू शकल्या. हे भाऊंचे मोठे योगदान आहे. ते आपल्याला कधीही विसरता येणार नाही.

**भाऊंचे आयोगातले विचार अत्यंत स्पष्ट**

भवरलालजी हे राज्य सरकारने १९९६ मध्ये माझ्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या दुसऱ्या जल व सिंचन आयोगाचे सदस्य होते. शेती व शेतक-यांचे जल सिंचनासंबंधीचे प्रश्न समजून घ्यावेत आणि छोट्या व मोठ्या प्रकल्पांची सद्यस्थितीही समजून घ्यावी व संबंधितांशी चर्चा करावी या उद्देशाने, सिंचन आयोगाने महाराष्ट्रातील अनेक भागांचा दौरा केला. या सर्व प्रवासामध्ये मोठ्या भाऊंच्या समवेत एकत्रित राहणे, बसणे, बोलणे अनेकदा घडून आले. आणि त्यातूनच विचार जमत गेल्यामुळे त्याचे दृढमैत्रीत सहजपणे केव्हा रूपांतर झाले ते आम्हा दोघांनाही कळले नाही. अशा मैत्रीतील अकृत्रिमता हे भाऊंचे दुर्मिळ व्यक्तित्व होते. ते सतत विस्तृत वाचन करीत असल्यामुळे अनेकांबरोबर खुल्या मनाने विचारांची देवाणघेवाण करीत असल्यामुळे त्यांच्या चिंतनात, विवेचनात आणि मांडणीत प्रकाशमय व्यापकता होती. त्यांचा मूळ स्वभाव हा माणसाच्या विचारांची खोली पारखून त्यांच्याशी मैत्री करण्याचाच होता. स्वभाव म्हणजे. 'स्व' चा भाव ओळखणे. मुळात 'स्व' ओळखणे अत्यंत अवघड. ‘स्व’ ओळखायला जो विशुद्ध भाव लागतो, त्यातून स्वभाव घडतो. स्वतःतल्या भावाची विचारपूर्वक जाणीव म्हणजे स्वभाव. ज्या संबंधितांतून अस्तित्वाला अर्थ देण्यासाठी मी धडपडतोय, त्याला स्वभाव म्हणतात. म्हणजे स्वभावाला 'स्व', जेव्हा व्यापक होतो, तेव्हा स्वभावाला व्यक्तिमत्व प्राप्त होते. भाऊंना ही 'स्व'ची जाणीव लवकर झाली होती आणि ती परिपूर्ण होती. त्यामुळे त्यांची 'स्व'ची यथार्थजाणीव आयुष्याच्या मुशीतून परिपक्व असा सुगंध घेऊन आली जिने आम्हाला कायम मैत्रीच्या धाग्यात गुंफून व गुंतवून ठेवले. पुढे ठिबक सिंचनाशी जोडल्या गेलेल्या पाणी पुरवण्याच्या व्यवस्था, शेतावर पसरावयाच्या प्लॅस्टिक पीव्हीसी व एचडीपीई पाईपांच्या विस्तृत प्रणाली यांमुळे कदाचित अनेकांचा असा गैरसमज होण्याचा धोका होता की, हे केवळ आर्थिक व्यापारी, हितसंबंधांशी जोडले गेलेले व्यवहार आहेत. पण त्यांच्या आर्जवी वागण्यातून आणि स्पष्टवक्तेपणातून व त्याला अनुसरून त्यांनी जळगावच्या जैन हिल्सवर भरविलेल्या अनेक शेतकरी मेळाव्यांमधून हे हळूहळू स्पष्ट होत गेले की त्यामागे त्यांचे शेतीवरचे प्रदीर्घ चिंतन व करावयाच्या उपाययोजनांची स्पष्टता त्यांच्या



*सिंचन आयोगाच्या बैठकीच्यावेळी सर्व सदस्यांना ठिबक सिंचनाची भवरलाल जैन माहिती देताना शेजारी डॉ. माधवराव चितळे, डॉ.एच.बी. उलेमाले, वसंतराव शिंपी, डॉ. श्रीरंग कद्रेकर, देवराम गोरडे, बापूसाहेब पुजारी व अन्य मान्यवर*




*जलसाहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. माधव गाडगीळ, सुरेश द्वादशीवार, डॉ. माधवराव चितळे, न्या. नरेंद्र चपळगावकर, डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, गजानन देशपांडे, भवरलाल जैन आणि कवि ना.धों. महानोर इ.*

मनामध्ये सतत रुंजी घालून विकसीत होत होती. त्यामुळेच सिंचन आयोगाचे सदस्य म्हणून सुद्धा आयोगातील चर्चामध्ये त्यांनी अतिशय खुलासेवार व स्पष्ट विचार मांडले. त्यात कुठेही गुळमुळीतपणा, धूसरपणा नव्हता.

### पाणलोट विकासाबाबत भाऊ आग्रही

मोठ्या धरणांच्या जागा या निसर्गाने निर्माण केलेल्या असतात. त्यामुळे सर्व ठिकाणी आपल्या मनाप्रमाणे मोठी धरणे करता येत नाहीत. ज्या क्षमतेची ती जागा आहे तेवढी साठवण करणारे धरण बांधावे लागते. या मोठ्या धरणांच्या उभारणीला व संख्येला मर्यादा असल्यामुळे पडलेल्या पावसाचा प्रत्येक थेंब न थेंब आपण शास्त्रोक्त पद्धतीने म्हणजे माथा ते पायथा (रिज टू बॉटम) या तत्वावर पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम राबवून पाणी अडविले पाहिजे, अशा आग्रही मताचे भाऊ होते. कारण जळगाव, वाकोद आणि अजिंठ्याच्या आसपासच्या परिसरातील पाण्याची टंचाई आणि त्यासाठी करावयाच्या उपाययोजनांमध्ये पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाचे अग्रगण्य स्थान त्यांच्या मनात स्पष्ट होते. पण त्या क्षेत्रीय विस्तार कार्यक्रमाबरोबरच त्याला नव्या तंत्र विज्ञानाची, आधुनिक शास्त्राची आणि शेतावर पसरणाऱ्या पाण्यातून होणा-या बाष्पीभवनामुळे वाया जाणाऱ्या पाण्याबद्दलची जागरुकता व चिंता होती. शेती सिंचनाचे पाणी हे हवेपासून, वाऱ्यापासून आणि उन्हापासून लपविले जायला हवे व शेतातील पिकांच्या मूळांपर्यंत ते घट न होता पोहोचले पाहिजे हा त्यांच्या विचारांचा मूळ गाभा होता.

## भाऊंच्या विचारांचे आयोगाच्या अहवालात प्रतिबिंब

सिंचनाची कुशलता आपल्या देशात व महाराष्ट्रात वाढवायची असेल तर सर्व पिकांना सूक्ष्मसिंचन (ठिबक व तुषार) पध्दतीनेच पाणी दिले पाहिजे, असा आग्रह भवरलाल भाऊंनी कायम सिंचन आयोगाच्या बैठकांमध्ये धरला होता. त्यामुळे आयोगाने घनमापन पध्दतीने मोजून पाणी आणि सोसायटयांमार्फत पाणीवाटप झाले पाहिजे अशा शिफारशी केल्या होत्या. इतकेच नव्हे तर नवे प्रकल्प करताना व बारमाही सिंचनाचा परवाना देताना ठिबक सिंचन सक्तीचे केले पाहिजे अशी अट घातली होती. सरकारने ती मान्य केली आणि आज आपण असे पाहतो आहोत की भाऊंच्या विचारांचे प्रतिबिंब आयोगाच्या अहवालात पडले असून त्याप्रमाणे ठिबक सिंचनावर आधारित प्रकल्प महाराष्ट्र व इतर राज्यांमध्ये उभे राहू लागले आहेत. हा भाऊंच्या आग्रह व विचारांना मिळालेला सकारात्मक प्रतिसाद आहे.

यासाठी 'रिसोर्स टू रूट' ही संकल्पना ते आग्रहीपणाने मांडत होते. यामागे शास्त्रीय विचार व दृष्टी होती, आणि म्हणूनच ते ठिबक सिंचन प्रणालीच्या क्षेत्रीय विस्ताराचे प्रकल्प आग्रहाने मांडीत असत व त्यांचा जाणीवपूर्वक पाठपुरावाही करीत असत. अशा कार्यक्रमांमध्ये छोटी धरणे किंवा मोठी धरणे हा पाणी साठविण्याचा पर्याय त्यांनी वादातीत ठेवला होता व पाण्याचे नाशविहीन वितरण व कमी पाण्यात पिकांची उत्कृष्ट जोपासना यावर लक्ष केंद्रित केले होते. त्या दृष्टीने ठिबक सिंचनाच्या प्रकल्पांची विस्तृत उभारणी वित्तीय पायावर व लाखो हेक्टर क्षेत्रावर त्यांनी सुदृढपणे करून दाखविली. ठिबक सिंचन हा एक खर्चिक व्यवहार आहे हा गैरसमज दूर करण्यात त्यांना यश आले व नव्या विज्ञान युगात ठिबक


ठिबक सिंचन पद्धतीची पाहणी करताना डॉ. माधवराव चितळे, त्यांच्या पत्नी विजया चितळे, सूनबाई आणि कवी ना.धों. महानोर

सिंचन व त्याचा आधार असलेल्या नळप्रणाली (पाईप) यांची क्षेत्रीय गरजांप्रमाणेच उंच व सखलतेप्रमाणे, जमिनीच्या मगदुराप्रमाणे वैज्ञानिक मांडणी कशी होत राहील याबाबत भवरलाल भाऊ आग्रही होते. किंबहुना जमिनीवरच्या घळी बुजविणे, जमिनींचे सपाटीकरण करणे, अशा मोठ्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पांपेक्षा पाण्याच्या वितरणातील कुशलता वाढविणे, बाष्पीभवनापासून शेतीतील पाण्याचे संरक्षण करून त्याची बचत करणे याकडे त्यांच्या विचारांचा कल अधिक होता.

**विकसीत ठिबक तंत्रज्ञानाची कमाल!**

ठिबक आणि तुषार या दोन्ही सिंचन वैज्ञानिक पद्धतींना पाठिंबा देताना कोणत्या पिकांना, कोणत्या जमिनींमध्ये व क्षेत्रीय चढउतारांच्या अवस्थांमध्ये कसे प्राधान्य द्यायला हवे याबाबत त्यांच्या विचारात स्पष्टता असल्यामुळे ठिबक संच कुठे व कोणत्या पिकांना वापरायचा आणि तुषार (फवारा) संच वा रेनगन कुठे व कोणत्या पिकांसाठी वापरायची याबद्दल त्यांनी कधी गल्लत केली नाही. कोणत्याच पाणी वितरण पद्धती या सार्वत्रिक होऊ शकत नाहीत तर क्षेत्रीय भूपृष्ठीय रचनेप्रमाणे, मातीच्या मगदुराप्रमाणे व पिकांच्या मुळांच्या रचनेप्रमाणे योग्य त्या तंत्राची वापरासाठी निवड करणे हे शेतक-यांच्या कुशलतेचे लक्षण आहे. भवरलाल भाऊ हे स्वतः यशस्वी उद्योजक होते पण उद्योग व्यवस्थेच्या ज्या प्रमुख दोन धारा आहेत - १) खनिजांवर आधारलेली उद्योग व्यवस्था आणि २) वनस्पतीवर आधारलेली उद्योग व्यवस्था. यात महाराष्ट्राची बव्हंश भूरचना पाहता खनिजांऐवजी शेती उत्पादनावर आधारलेली उद्योग रचना ही महाराष्ट्राला अधिक लाभदायी, टिकावू, रोजगार देणारी आणि सधनता देणारी होणार आहे, याबद्दल त्यांच्या मनात साशंकता नव्हती. किंबहुना उद्योग व्यवस्थेमध्ये केवळ शेतीतून घ्यावयाच्या उत्पादनाच्या बरेच पुढे जाऊन त्या उत्पादनांची साठवण, प्रक्रिया आणि विपणन-विस्तार यावर त्यांचा भर होता. आणि त्यादृष्टीने त्यांनी केवळ स्वतःच्याच उद्योगांची विस्तार, व्यवस्था केली असे नाही तर इतरांनाही या दिशेने जाण्यासाठी सतत प्रोत्साहीत केले आणि त्यामुळेच जळगाव, वाकोद, भुसावळ, यावल, रावेर, बु-हानपुर, नंदूरबार व शिरपूरचा परिसर हा पूर्णपणे दारिद्र्यमुक्त होऊन आर्थिक विश्वात एक अग्रेसर परिसर म्हणून प्रसिद्धीस आला आहे. अशीच स्थिती सोलापूर जिल्ह्यालाही जैनने विकसीत केलेल्या टिश्यूकल्चर ग्रॅन्डनैन केळीच्या निर्यातीमुळे प्राप्त झाली आहे. केळी निर्यातीत जळगावला मागे टाकून सोलापूर जिल्हा आता पूढे गेला आहे. ही भाऊंच्या कंपनीने विकसीत केलेल्या तंत्रज्ञानाची किमया आहे. भवरलालजींचे शेती क्षेत्रातील काम वृत्तपत्रीय प्रसार माध्यमातून मला दिल्लीत असतानाही वाचायला मिळते होते. आणि म्हणून एकदा मी मुद्दाम दिल्लीतून त्यांचे हे काम पाहण्यासाठी जळगाव-वाकोद क्षेत्राच्या निरीक्षण

भेटीकरिता गेलो होतो. त्यातून आमचा परिचय होऊन तो वाढत गेला व पुढे त्याचे दृढमैत्रीत रूपांतर झाले. एकदा जळगावहून औरंगाबादला परत जात असताना माझे वाहन रस्त्यात बंद पडले. असे झाल्याचे भाऊंना दूरभाषवरून कळविताच त्यांनी ताबडतोब स्वतःचे वाहन इतर वाहनांच्या जुळवाजुळवीत वेळ न घालविता त्वरित माझ्यासाठी पाठवून दिले आणि त्या वाहन चालकाला सक्त ताकीद होती की थेट माझ्या घरापर्यंत औरंगाबादला सुखरूप पोहोचेपर्यंत जळगावला परत यायचे नाही. मैत्रीभावाची दृढता ही अशी असते.

भाऊंची स्वतःची राहणी विचारसरणीप्रमाणेच अत्यंत निर्मळ होती. स्वच्छता हा त्यांच्या सार्वजनिक व्यवहारातला त्याचप्रमाणे कौटुंबिक व्यवहारातलाही महत्वाचा घटक होता. आणि त्या बाबतीतली दक्षता हा आम्हा दोघांना जोडणारा मोठा धागा होता. त्यामुळे सिंचन आयोगाच्या कामासाठी आयोगाच्या सदस्यांनी मिळून महाराष्ट्रभर जे मोठ्ठाले दौरे केले त्यात भाऊ नेहमी माझ्याबरोबर एकाच खोलीत एकत्र राहायला असत. त्या बाबत ते कधी गडबडले नाहीत. वैचारिक क्षेत्राबरोबरच राहणीच्या समविचारांमुळे जिव्हाळा वाढत गेला. केवळ उद्योजक म्हणून किंवा व्यापारी विस्तार म्हणून यशस्वी न होता आपण नव्या युगाला साजेसे वैज्ञानिक विश्व कृषी जीवनातही सुदृढ केले पाहिजे ही त्यांची ठाम भूमिका होती. आयोगात होणा-या सर्व चर्चांमध्ये ते ही भूमिका आग्रहाने मांडीत असत. त्याचे प्रतिबिंब त्यामुळे आयोगाच्या अहवालात पडलेले आपल्याला दिसेल. त्यांच्या आणि माझ्या मैत्रीचा प्रारंभीचा काळ मी दिल्लीत असतानाचा होता. भारतीय मंचावरही मी अशा नव्या तंत्राचा पाठपुरावा करीत राहावा अशी त्यांची अपेक्षा होती जे ती वारंवार व्यक्त करीत. परंतु भारतातील हवामानाची विविधता, शेती उत्पादनातील विविधता, शेती हंगामातले वेगवेगळे दिवस आणि ऋतु यामुळे भारतासाठी काही समान तत्वे विकसीत करणे सिंचन व्यवस्थेत अवघड आहे हे त्यांच्याही लक्षात येऊ लागले होते आणि त्यादृष्टीने ठिबक किंवा तुषार सिंचन अशा नवीन पाणी वितरण प्रणालीची व्यवस्था प्रदेशनिहाय, क्षेत्रनिहाय कसकशी बदलत राहिली पाहिजे याकडे ते अधिकाधिक लक्ष देवू लागले होते. त्या दृष्टीने नव्याने काही तत्वे मांडणे आवश्यक आहे येथपर्यंत ते येऊन पोहोचले होते.

## "रिर्सोस टू रूट" संकल्पना - भाऊंची दूरदृष्टी

पाण्याच्या साठवणुकीसाठी आपण भलीमोठी धरणे बांधतो. त्यासाठी प्रचंड खर्च करतो. वर्षानुवर्षे धरण बांधणीचे काम चालते. कोट्यावधी रूपये खर्च केल्यानंतर प्रकल्पात साठलेल्या पाण्याचा जपून, काटकसरीने वापर झाला पाहिजे आणि अधिकाधिक क्षेत्राला व जास्तीत जास्त शेतकऱ्यांना ते पाणी मिळाले पाहिजे. यासाठी पाणी बंदिस्त पाईपातून वाहून नेले पाहिजे आणि ठिबक सिंचनाद्वारे ते थेट पिकांच्या मुळाशी दिले पाहिजे (रिसोर्स टू रूट) जेणेकरून पाण्याची नासाडी थांबेल व पाणी वापर कार्यक्षमता ९० टक्क्यापेक्षा अधिक मिळू शकेल. ही संकल्पना भवरलालजींची होती. पारंपारिक सिंचन पद्धतीमध्ये पाणी वापर कार्यक्षमता केवळ ३०-३५ टक्के मिळते व पाणी हे जमीनीला दिल जात त्यामुळे रिर्सोस टू रूट हि संकल्पना अवलंब करणे काळाची गरज आहे असं त्यानी आयोगाच्या समोर लावून धरलं होत. सिंचनाच्या साठी लागणाऱ्या मूलभूत सोयी सुविधा निर्माण करताना पाईप, ठिबक व तुषार संच व अन्य जी साधने सिंचनासाठी लागतात ते तयार करणाऱ्या उद्योगांना इन्फ्रास्ट्रक्चर इंडस्ट्रीचा दर्जा तसेच प्रायोरीटी सेक्टर केले पाहिजे आणि त्याकरिता आवश्यक असणारे वातावरण निर्माण केले पाहिजे असा भाऊंचा आग्रह होता. तो रास्तही होता. या आग्रहातच शेतकरी व शेती या दोघांचेही हित दडलेले होते. त्यामुळे आयोगाने भाऊंचा आग्रह व शिफारशी उचलून धरल्या. त्याची चांगली फळे आता आपल्याला बघायला मिळत आहेत!

पण प्रत्यक्षात भारतासारख्या विस्तृत देशामध्ये वेगवेगळ्या प्रादेशिक व्यवस्था कशा विकसीत व्हायला हव्यात यावर त्यांचे चिंतन व काही प्रमाणात प्रयोगही सुरू असतानाच काळाने त्यांना आपल्यापासून अकालीच हिरावून नेले. यात त्यांच्या उद्योग व्यवस्थेचेच नव्हे तर भारताचे आणि महाराष्ट्राचे फार नुकसान झाले. ती उणीव आता भरून काढण्यासाठी आपल्याला त्यांच्या विचारांचा पाठपुरावा करणाऱ्या 'कृषितीर्थ' मासिकासारख्या माध्यमांचा अधिकाधिक उपयोग करायला हवा. त्यांनाही त्यातच आनंद होत राहील.

# भाऊंची नितीमत्ता व मानवता अधिक भावणारी

**अरूण गुजराथी**
माजी विधानसभा अध्यक्ष



भवरलाल जैन यांना आम्ही सारेजण आणि खान्देशातील लोकही 'भाऊ' याच नावाने ओळखतात. अजिंठ्याच्या पायथ्याशी असलेल्या वाकोद सारख्या एका छोट्या खेडेगावातून ते आले. पण त्यांनी स्वकर्तृत्वाने स्वतःचा परिचय खान्देश, महाराष्ट्र, भारत आणि जगभर निर्माण केला. काम हाच त्यांनी परमेश्वर मानला. आयुष्यभर कर्माचीच पूजा करीत राहिले. त्यामुळे एक व्यक्ती एका आयुष्यात काय काम करू शकते याचे दैदीप्यमान उदाहरण म्हणून जग आज त्यांच्याकडे पाहते आहे. सद्भावाने आचरलेल्या विहित कर्माने व्यापकतेचे दर्शन घडून सर्व जीवन यज्ञमय होते याचा अनुभव घेतलेल्या भाऊंनी विहित कर्माचे हे अनन्य साधारण महत्व ओळखून त्याचे निष्ठेने आचरण केले. त्यामुळे अशा जिव्हाळ्यानेच अनुष्ठिलेल्या विहित कर्माने केवळ त्यांचे एकट्याचे वैयक्तिक हित न साधता सर्व समाजाचे कल्याण झाले. विहित कर्म हाच मानवी जीवनातील खरा ओलावा असून आस्थेने विहिताचरण करणे हीच सर्वात्मकाची खरी सेवा आहे असे मनोमन जाणलेल्या भाऊंनी

**ते विहित कर्म पांडवा । आपुला अनन्य वोलावा**
**आणि हेचि परमसेवा । मज सर्वात्मकाची ।। १८ . ९०६**

संत ज्ञानेशांच्या या एका अप्रतिम ओवीत कर्मयोगाचे मूलभूत सूत्र गुंफून व्यक्ति - समष्टि जीवनाची सुरेख सांगड घातली. वैयक्तिक व सामुहिक जीवनाची समन्वय साधणारा उन्नत विधायक दृष्टीकोन या ओवीत किती सहजतेने प्रकटला आहे हे भाऊंच्या निदर्शनास आले नसेल असे थोडेच आहे! स्वतःचे विहित कर्म आस्थेने व प्रामाणिकपणे

आचरले असता स्वतःला तर आनंद मिळतोच, पण आपण ज्या समाजाचे घटक असतो, त्याचीही प्रगती होत असते याची जाणीव असलेल्या भाऊंनी कर्मासाठी शेती हाच विषय निवडला. शेतकऱ्याने आपले कृषिकर्म निष्ठेने आचरले असता धनधान्यादी लाभातून त्याला मिळणाऱ्या आनंदा एवढीच सर्वांच्या अन्नधान्यविषयक गरजा भागून समाजाला प्राप्त होणारी आत्मनिर्भरताही महत्वाची आहे याची मनोमन खात्री पटलेल्या भाऊंनी प्रत्येकाने आपले विहित कर्म आत्मीयतेने केले, तर स्वहिताबरोबर स्वाभाविकपणेच सर्व समाजाचेही कल्याण होत असेत आणि त्यामुळेच सर्वांठायी आविष्कारलेल्या परमात्म्याची खरी सेवा होत असते. विहित कर्म हे वैयक्तिक जीवनात 'ओलावा' व सामाजिक जीवनाच्या संदर्भात 'सर्वात्मकाची परमसेवा' आहे, अशा प्रकारच्या सखोल भाष्यावरून भाऊंच्या जीवनविषयक व्यापक दृष्टिकोणाची कुणालाही कल्पना यावी. नुसते कर्म किंवा विचारच नाही तर भाऊंचे संपूर्ण आयुष्य समर्पण घेण्यासारखे आहे. समर्पण फक्त कुटुंब, स्वतःचा समाज, जळगाव यांच्यासाठी नाही तर संत ज्ञानेश्वरांना जे अभिप्रेत होते, "जे जगी जीवनासारखे वस्तु उपरवी, परीजाते जिवीत राखे तृणालाही", अशा प्रकारचे होते.

त्यांच्या जीवनात बुद्धीमत्ता व गुणवत्ताही फार उत्तम होती. तथापि त्यांच्यामध्ये ठासून ठोसून भरलेली नितीमत्ता आणि मानवता मला अधिक भावते. भाऊंचे संपूर्ण जीवन सिंधू सारखे होते. त्यातला बिंदू आपण घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समाजाच्या आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी त्यांनी शेतीक्षेत्रात जे अनेक प्रयोग केले व त्यातून त्यांना जी उमज प्राप्त झाली त्याने त्यांच्या संशोधनाच्या कार्याला धार व व्यापकता आली. प्रत्येक माणूस सभोवतालच्या परिसरात सतत काही न काही शोधत असतो. तो आपल्या शोधांमधून प्रयोगशील होतो. प्रत्येकाचे आयुष्य प्रयोगशील असते. पण समाजाच्या कल्याणासाठी थोड्यांचे असते. जगण्याची प्रत्येकाची प्रयोगशाळा वेगळी असते. भाऊ तर शास्त्रज्ञ असल्यासारखेच होते. कुठलाही विषय अभ्यास वा संशोधनासाठी हाती घेतला की ते खोलवर तळापर्यंत जात. निष्कर्ष हाती आल्याशिवाय विषय अर्धवट सोडायचा नाही ही त्यांची संशोधनातली वृत्ती होती. त्यामुळे ते संशोधनात अखंड निमग्न असत. आपल्या निरीक्षणातील काही गृहीते ते अभ्यासून तपासत. अभ्यासातून काही महत्वाचे निष्कर्ष



अरूणभाई गुजराथी दीपप्रज्वलन करताना शेजारी विलासराव देशमुख, शरद पवार आणि भवरलाल जैन

हाती लागले की ते कसोशीने मननाच्या कसोटीवर तपासत आणि हे सारे वस्तुनिष्ठतेने करीत. जीवनात वस्तुनिष्ठतेबरोबर आत्मनिष्ठाही लागते. त्यामुळे जगायच्या विकासकक्षा वाढतात. जगण्याचे शरीरभान विज्ञान देते, नि आत्मिक विकासाचे भान विद्या व कला देतात. जगण्याच्या अनुभवातली घनता प्रयोगातून येते हे चांगले ठावूक असलेल्या भाऊंचा म्हणूनच प्रयोग हा श्वास बनला होता.

'प्र' हा उपसर्ग आहे. 'योग' मध्ये 'युज' हा धातू आहे. 'युज' म्हणजे जोडणे. जो समाज आणि अभ्यास यांना जोडतो. तो प्रयोग यालाच अध्यात्मात प्रवृत्ती आणि निवृत्ती यांना जोडणे म्हणजे योग होय असे म्हणतात. जो सहज जुळतो तो योग. सहज जुळते आहे हे कळण्यासाठी समज यावी लागते. यामध्ये सम आहे. हीच जगण्याची सम आहे. उमज हा शब्द आपल्या वापरात फार कमी आहे. पण उमज ही जगण्याची नस आहे. समज यायला जन्मजात समज लागते. या समजेला खोली आली, की उमज येते. उमज म्हणजे समजेच्या खोलीचे अर्थगर्भ मौन. समज काहीशी प्रकट होते. उमज प्रकटातून प्रकटते. तशी उमज दिसत नाही, पण व्यक्तित्वातून जाणवते. भाऊंच्या सहवासात आल्यानंतर या उमजेचे दर्शन समज असणाऱ्यांना बरोबर होत असे. उमज आपसूकही येते आणि परिस्थितीनेही येते. आपणच आपला मूल्यात्मक विचार जपण्यासाठी उमज उपयोगी पडते. कधीकधी समजण्यात समज कमी पडू शकते. उमजेत समज परिपक्व होते. त्यामुळे काहीही उणे पडत नाही. आयुष्याची वळणे आपल्याला स्वच्छ अनुभवता येतात हे भाऊंच्या जीवनाकडे पाहिले की आपल्या दृष्टीस येते. यातून आपण चिरःशक्तीचा अनुभव घेतो. आकाशातून वर्षा होते. पाऊस पडतो. पिकांच्या व गवताच्या मुळाशी आणि जमिनीत ते पाणी जिरून, मुरून जाते. अशा प्रकारचे समर्पण जीवनात भाऊंचे होते. उजव्या हाताने दिलेल्या दानाची, केलेल्या मदतीची ते डाव्या हातालाही कल्पना येऊ देत नसत. इतके ते दानशूर होते पण दानाचा बोभाटा, जाहिरात करणारे नव्हते.

भाऊंच्या अंगी असणारा विवेक घेण्यासारखा होता. बुद्धिमत्तेला विवेकाची जोड असेल तर ती यशस्वीतेच्या दिशेने जाते. संत ज्ञानेश्वरांनी लिहून ठेवले आहे,


**मी अविवेकाची काजळी,**
**फेडूनि विवेकदीप उजळी,**
**ते योगियां पाहे दिवाळी, निरंतर ।।**

बुद्धिमत्तेला विवेकाची जी जोड भाऊंनी दिली त्यामुळे त्यांचा प्रत्येक शब्द न विचार चिंतनीय झाला, अमर झाला आणि ऐकणाऱ्यांच्या हृदयस्थ झाला.

त्यांच्यातील उद्योजकता ही असाधारण होती. जैन इरिगेशन या नावाला आज जी जगभर प्रतिष्ठा आहे ती भाऊंच्या



*माजा राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना जैन हिल्सवर एरोपोनिक्स व हायड्रोपोनिक्स मॉडेल दाखविताना भवरलाल जैन आणि अजीत जैन*


सतत वाचन, लेखन, चिंतन यात रममाण असणारे भवरलाल भाऊ

विचार व कर्तृत्वामुळे. भाऊ म्हणजे प्रामाणिकपणा, दिलेल्या शब्दाला पक्के हे समीकरण होते. म्हणूनच या कंपनीचा अमेरिकेसह सर्व जगभर वृक्ष विस्तारत गेला. ३१ कंपन्या भाऊंनी परदेशात काढल्या आणि त्या सगळ्या जळगावात बसून चालविल्या हे केवढे मोठे धाडस. त्यांच्यावर आयुष्यात संकटे आली नाहीत असे नाही. पण संकटांना सामोरे जाऊन आव्हान स्वीकारण्याची व मुकाबला करण्याची शक्ती त्यांनी अंगी बाळगली होती. त्यामुळे भल्या भल्या आर्थिक आणि शारीरीक अशा संकटांचा त्यांनी पराभव केला. यशस्वी मुकाबला केला. आता मला नेमका विषय आठवत नाही. पण एकदा गप्पांच्या ओघात मी भाऊंना म्हटले, “भाऊ तुम्ही संधी घ्या. संधी परत परत येत नाही”. त्यावर भाऊंनी मला उत्तर दिले, “मी संधी घेणारा माणूस नाही. संधी निर्माण करणारा माणूस आहे”. इतरांच्यासाठी त्यांनी अनेक वेगवेगळ्या संधी निर्माण केल्या व सहकाऱ्यांना प्रगतीपथावर नेले. त्यांचा विकास घडवून आणला.

भाऊंशी बोलताना त्यांच्या शब्दातून प्रकाश मिळत असे. ‘शब्द पृथ्वी, शब्द आकाश । शब्द देतात प्रकाश’ असे त्यांचे बोलणे होते. त्यांच्याशी संवाद साधताना अनेक बाबी लक्षात येत होत्या. त्यावेळी वाटत असे “He is a monument of many virtues”. भाऊ म्हणजे सद्गुणांची खाण.

भाऊंशी गप्पा मारताना एकदा सहजच कर्जाचा विषय निघाला. त्यांनी मला सांगितले, “कर्ज घेण्यासाठी आधी कागदपत्रे द्यावी लागतात. अर्ज करावा लागतो. मी मात्र फार भाग्यवान आहे. बँका स्वत:हून माझ्याकडे येताहेत की, आम्ही तुम्हाला पैसे देतो. तुम्ही कर्ज घ्या. त्यावर मी बँकांना म्हणालो, जेव्हां गरज भासेल तेंव्हा नक्की घेईन. तेंव्हा मात्र मागे हटू नका ” याला म्हणतात विश्वासार्हता, क्रेडीबीलीटी, बाजारातील पत. बँका कुणालाही पैसे द्यायला तयार होत नाहीत. भाऊ शब्दाला पक्के होते. त्यांनी शेवटपर्यंत विश्वासार्हता जपली. त्यांचे वागणे, बोलणे, व्यवहार, कार्य हे सगळे अलौकीक आहे असेच मला वाटते.

मला भाऊंची संशोधक वृत्ती फार आवडायची. ते सतत ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञान यांच्या मागे धावत होते. त्यांची कास धरत पुढे जाण्याचा प्रयत्न करीत होते. ज्ञानमय अवस्था जर अनुभवायची असेल तर प्रकृती जाणून घेणे महत्वाचे आहे. प्रकृती जाणणे म्हणजे विज्ञान. प्रकृतीला जिज्ञासेतून सत्वस्थ करणे म्हणजे ज्ञान. ज्ञानासाठी लढावे लागते. ज्ञानातली अविद्या नाहीशी करावी लागते. प्रकृतीचे सामर्थ्य ओळखून ज्ञान अभ्यासावे लागते. प्रकृती पंचमहाभूते, मन, बुद्धी, अहंकार यांनी मिळून तयार होते. ही जीवन प्रकृती असते. तिला पराप्रकृती असे म्हणतात. ही श्रेष्ठ प्रकृती असते. हीने जग धारण केलेले असते. ही चेतन प्रकृती असते. हिच्यामुळे शरीराला जिवंतपणाची टवटवी असते. हीच्या सानिध्याने



*भवरलालजींच्या जीवनावर गांधीजींच्या तत्वज्ञानाचा प्रचंड प्रभाव होता*

मन आणि बुद्धी कार्यरत राहते. मनाचा आणि बुद्धीचा एखादा कंगोरा जरी लक्षात आला तरी, ज्ञानविज्ञानाला खूप आनंद वाटतो. मन ओळखणे, बुद्धी तपासणे हे ज्ञान-विज्ञानाचे काम आहे. मनाचे व्यापार जरी अनंत असले तरी मनाच्या प्रकटीकरणातून प्रकृतीचा बोध होतो. भाऊंशी संवाद केल्यानंतर या प्रकृतीचे अचूक दर्शन होत असे. कारण त्यांचे संपूर्ण जीवन व व्यवहार हा पारदर्शी होता, स्वच्छ होता आणि नेहमी इतरांच्या कल्याणाकरीता विचार करणारा होता. त्यांच्या संशोधक वृत्तीचा लाभ शेतकऱ्यांना व शेतीक्षेत्राला मिळाला. ते स्वतःच एक चालते-बोलते कृषी विद्यापीठ होते. संशोधनातून कोणताच विषय त्यांना वर्ज्य नव्हता. टिश्यूकल्चर ही भाऊंची फार मोठी देणगी आहे. टिश्यूकल्चर सर्वांना आवडते. कारण भाऊंच्या स्वभावातील कल्चर. त्यांच्या जीवनात अहंकार नाही हा त्यांच्या जीवनाचा अलंकार आहे.

भाऊंनी जळगांवात उभे केलेले गांधीतीर्थ हे जगात सर्वश्रेष्ठ आहे. महात्मा गांधीजींच्या विचारांचा त्यांच्या मनावर लहानपणापासून जो पगडा बसला होता त्या विचारांना व परिपक्वतेला आलेले सुंदर फळ म्हणजे गांधीतीर्थ. गांधीच्या विचारांचा वारसा भाऊंनी जो जतन केला आहे तो शतकानुशतके पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देत राहील. भाऊ उत्तम लेखकही होते. त्यांना सरस्वतीचे वरदान लाभले होते. त्यांचे “ती आणि मी” हे पुस्तक पत्नीबद्दलच्या भावना कशा व्यक्त कराव्यात याचा अप्रतिम नमुना आहे.

भाऊंच्या निधनानंतर अशोकभाऊ व त्यांच्या सर्व बंधूंनी वारसा व्यवस्थितपणे जतन करून तो समृद्ध करण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. त्यांच्या परिवाराकडून चॅरिटी ही सर्वांनी घेण्यासारखी गोष्ट आहे. संपत्तीसोबत मानवता व दयाही असली पाहिजे हे अनेकजण त्यांच्याकडून शिकले. भाऊ, इतका मोठा माणूस पण राजकारणापासून अलिप्त राहीले. कोणत्याही राजकीय पदाचा मोह त्यांना झाला नाही. आप्पासाहेब पवार, शरदपवार आणि आण्णासाहेब शिंदे यांच्याशी असणारी त्यांची अभिन्न मैत्री ही फार उच्च श्रेणीचे आहे. चरित्र आणि चारित्र्य जपणारे हे व्यक्तिमत्व आम्हा सर्वांना स्मृती आहे तोवर चिरंतन राहील एवढे निश्चित. भाऊंच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन.



# तूच खरा! जलतपस्वी!

तूच खरा!आहे जलतपस्वी!
रूप तेजस्वी! अहिंसात्मक!!

अहिंसात्मक वेष! निष्ठेचे तत्व!
शेतीचे ममत्व! तुझा अंगी!!

शेती विकासाचे! तू दिले मंत्र!
सिंचनाचे तंत्र! अत्याधुनिक!!

प्रतिथेंब पाणी!किंमत बहुमूल्य!
संजीवनी अम्रततुल्य! तू जाणली!!

पाण्याचा थेंबाची! अग्निपरीक्षा!
शेतीची उपेक्षा! तू थांबवीली!!

जलक्रांतीचे तंत्र! आहे दैवीशक्ती!
घरोघरी भक्ती! तुझा साधनांची!!

तुझे कार्य हे! अमूल्य ठेवा!
कुणब्याला हेवा! कायम तुझा!!

कुणब्याचे सुख!चिंतीले सदैव!
तुझ्यारूपी देव! आहे साक्षात!!

तुझा क्रांतीचा! अखंड वाहे झरा!
शेतकऱ्यांचा घरा! तंत्रज्ञान तुझे!!

---

संदिप देशमुख कामणगांवकर

Post Regn. No.: JAL/417/2022-2024
Published on 19th of every month, posted on 28th of every month at Jalgaon-425001
RNI NO. MAHMAR/2018/76944

# १२५ वर्षांची मातीची कहाणी
(१८९७-२०२३)





राजस्थानातील
मारवाड-आगोळाई गावातून पाण्याच्या शोधात दोन युवक बाहेर पडले.
ते साल होतं १८९७ सव्वाशे वर्ष झाली या गोष्टीला. जवारमलजी आणि धाकटा छोटमलजी.

जोडी थेट पोचली अजिंठ्याच्या पायथ्याशी. मुक्काम वडाळी - वाकोद,
जिल्हा जळगाव. हाती रिकामा लोटा, उरात अफाट जिद्द.
रुजलेल्या कठोर परिश्रमाचा बांधा, भविष्य घडविण्याची अपरंपार उमेद.

जवारमलजींची तीन अपत्यं, सागरमलजी, मुकनचंदजी, हस्तीमलजी. सागरमलजींचे चिरंजीव
हिरालालजी यांचा नित्यक्रम-

रामप्रहरी धार काढून गडी-माणसांना उठवायचं, ऊन-पाऊस-वारा यांची
तमा न बाळगता चालायला लागायचं. शेती-माती करायची,धान्य-दाण्याची देवघेव करायची.
पै-पैका शिलकी टाकायचा. पुनः शेतीतच लावायचा. शेती वाढवायची.

*मोठ्या एकत्र कुटुंबाला गुण्यागोविंदानं नांदवायचं.* हे सगळं करत असताना माणुसकी जपायची.
प्रेम द्यायचं, सग्या-सोयऱ्यांपेक्षा शेजार, शहरापेक्षा गाव जवळचं मानायचं. धनाजी वानखेडे असो वा
नामदेवराव देशमुख अर्ध्या रात्रीही परस्परांच्या हाकेला धावून जायचं! कै. हिरालालजी व गौराबाईच्या कुंडल्यात
विचित्र ग्रहांची युती. ओळीनं चार अपत्यं जगली नाही म्हणून पाचवं हरिजनाच्या ओटीत टाकलं, जगलं.
त्याचं नाव भवरलाल, धाकटा कांतीलाल.

आजही तळागाळातल्या माणसाबद्दल व वाकोद-जळगावबद्दल प्रेम, कृतज्ञता, त्यांनीच हे जीवन दिलं ही
भावना कायम दिसून येते. त्यांचे पांग याच जन्मात फेडायसाठी सारखी तळमळ, आकांक्षा, धडपड.

वाडवडिलांनी पाण्यासाठी दाहीदिशा शोधल्या. भवरलालजींनीही तोच ध्यास घेतला.

पाणी नियोजनाचा. पिढ्यापिढ्यांना जोडणारा हाच अंतरीचा धागा !

त्याला जोड दिली नवतंत्राची, ज्ञानाची, संशोधनाची, मातीच्या बांधिलकीचं तर बाळकडूच होतं.
राणीदानजी, बन्सीलालजी, दलीचंदजी, शिवराजजी, कांतीलालजी, गिरिधरलालजी यांच्या साथसोबतीने भवरलालजींनी उद्योगाची
पायाभरणी केली. निष्कलंक चारित्र्य हा वारसा पिढ्यानपिढ्या होताच. साधेपणा आणि सदाचार रक्तातच. संयुक्त कुटुंबातील सर्वांचं जगणं
खुल्या पुस्तकासारखं, कुणाला कोणी शिकवलं नाही. परस्परांकडे पाहूनच ते आपसूक घडत गेले.

हा हा म्हणता रोपट्याचा कल्पवृक्ष झाला. पुढची पिढी आली.

भवरलालजींचे आणि कांताईंचे अशोक, अनिल, अजित, अतुल व कांतीलालजींचे आणि शकुंतला यांचे अभय, अविनाश वारसा
सांगूनच मोठी झाली. डोक्यावरची पगडी गेली, टोपीही गेली, हातात मोबाईल व प्रसंगी गळ्यात टाय आला. बैलगाडी गेली. विमानं आली.

- शेती आधारीत व्यवसाय मात्र कायम राहिले. भूमिपुत्रांचा आर्थिक स्रोत उन्नत करणारे कृषिविषयक प्रकल्प वाढले. शेतकऱ्यांच्या
भरभक्कम सहकार्याने वाढत्या उद्योगासोबत सहकाऱ्यांच्या संख्यात्मक-गुणात्मक वाढीसह कारखाने, कार्यालयेही वाढली. वाकोद ते थेट
जगभर आंतरराष्ट्रीय स्तरावरचा व्याप सहकाऱ्यांच्याही परिश्रमाने आणि बांधिलकीने विस्तारला. भारत सरकारद्वारा भवरलालजी 'पद्मश्री'ने
सन्मानित झाले. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्काराने वेळोवेळी विभूषितही झाले, कर्मभूमीशी असलेलं नातं मात्र कायम राहिलं. आजही.
अशोकला ज्योतीची, अनिलला निशाची, अजितला शोभनाची तसेच अतुलला भावनाची आत्मीयतापूर्वक साथसोबत लाभली,
संयुक्त परिवाराचा वसा आणि वारसा परंपरेने चौथी पिढीही प्रेमाने सांभाळताहेत... चौथी पिढी - अथांग-अंबिका, अमोली, अभेद्य, आशुली,
आरोही, अभंगसुद्धा त्याच व्यवसायात जुडली. आत्मन आणि अन्मय याच वाटेवर येतील...

अजूनही भली पहाट सोबत्यांच्या साथीनंच उगवते.

आजही अशोकजींच्या बरोबर 'घनश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला' भूपाळीसह कोवळ्या उन्हातल्या ऋचा कानावर घेत अर्थम्,
भवरलालजींचा आणि कांताईंचा पणतू पहाट आनंददायी करतो...

सव्वाशे वर्षांच्या कहाणी, परंपरेची, साठा उत्तरांची, सुफळ तर झालीच पण निरंतर प्रवाहितही आहे...
जगण्याला अर्थ देणाऱ्या थेंबापासून शाश्वततेचा भावार्थ देणाऱ्या तीर्थापर्यंत...

भवरलाल अँड कांताबाई जैन फाउंडेशन
www.bkjfoundation.org
गांधी रिसर्च फाउंडेशन
• सत्य • अहिंसा • शांती
www.gandhifoundation.net
जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.
कल्पना क्रमापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.
www.jains.com
जैन फार्मफ्रेश
जैन फार्म फ्रेश फूड्स लि.
www.jainfarmfresh.com
अनुभूति स्कूल
www.anubhutischool.in
कांताई नेत्रालय
आय केयर फॉर यू

कृषीतीर्थ मासिकाची
डिजीटल आवृत्तीसाठी
कोड स्कॅन करा